www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 297 | शुक्रवार दि. 11 जुलै २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४




# जनसुरक्षा विधेयक एकमताने मंजूर

## नक्षलवादी संघटनांच्या कारवायांना चाप लावण्यासाठी मोठा निर्णय

गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त ठरलेले महाराष्ट्र जनसुरक्षा वियेधक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. जनसुरक्षा विधेयकावर विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेला अहवाल ९ जुलै रोजी विधानसभेत पटलावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले. त्यानंतर एकमताने हे जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आलं. १२,५०० सूचनांचा अभ्यास करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर केलं होतं. चर्चेनंतर आवाजी मतदानाने हे विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. शहरी नक्षलवादी संघटनांच्या कारवायांना चाप लावण्यासाठी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच हे विधेय




राजकीय भूमिकेतून नाही, तर देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचं असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. या विधेयकाला डहाणूचे माकपचे आमदार विनोद निकोले यांनी विरोध केला. "मी कम्युनिस्ट पक्षाचा एकमेव आमदार सभागृहात आहे. मार्क्स संविधानाला मानतो. डाव्या संघटनांच्या नेतृत्वाखाली जेव्हा आम्ही नाशिकवरुन शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. तेव्हा बोर्डाच्या परीक्षा होत्या. विद्यार्थ्यांना अडचण होईल म्हणून आमचा शेतकरी सलग चालून रात्रीच मुंबईत दाखल झाला. जेणेकरुन दिवसा आपला त्रास होऊ नये. आमच्या अशा मोर्चांनाही उद्या बेकायदेशीर ठरवणार आहात का," असा सवाल करत आमदार विनोद निकोले यांनी विधेयकाला विरोध दर्शवला. "जनसुरक्षा कायद्यासंदर्भात अनेकांच्या मनात संभ्रम आहे, परंतु पुराव्यांची पूर्तता झाल्याशिवाय अटक करण्याची तरतूद या कायद्यात नाही, बॅन झालेल्या संघटनेचा कुणी मेंबर असेल तरच अटक होईल. इतर राज्यापेक्षा आपण जो कायदा केलेला आहे तो अतिशय व्यवस्थित आहे, आपला उद्देश कुणालाही उचलून जेल मध्ये टाकणं हा नाही. अनेकांनी या कायद्याच्या बाबतीत संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न केले परंतु सरकारच्या वतीने सर्व सन्मानित पत्रकारांना बोलवून मुद्दा दर मुद्दा त्यांच्या आक्षेपांचं निराकरण करण्यात आलं," असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# दृष्य सत्य

## जनतेच्या नजरेतून

### शासनाच्या दरबारात

### शिवाजी पार्कजवळ कचऱ्याचा ढीग... स्वच्छतेला तडा!



**प्रतिनिधी**
**मयुर प्रकाश धुरी**

सेनापती बापट चौक, शिवाजी पार्क – गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचा मोठा ढीग नजरेआड नाही, पण प्रशासनाच्या दुर्लक्षात आहे. दादर चौपाटी, शाळा, रुग्णालय, मैदान, चैत्यभूमीकडे जाणाऱ्या नागरिकांना रोज दुर्गंधीतून वाट काढावी लागते!

**"स्वच्छ मुंबईचं स्वप्न. कचऱ्यात गाडलं जातंय!"**

**तातडीने स्वच्छता व्हावी, हीच नागरिकांची अपेक्षा!**

## खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित पळस विभागात विविध कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पेण सुधागड मतदार संघाचे कार्याध्यक्ष तथा जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीचे (दिशा समिती) सदस्य शिवराम शिंदे यांच्या पुढाकाराने तसेच पळस ग्रुप ग्रामपंचायत व पळस विभागीय रा.कॉ.च्या वतीने बुधवार 09 जुलै रोजी पळस येथे रायगडचे लोकप्रिय खा.सुनील तटकरे यांच्या 70 व्या वाढदिवसानिमित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पळस येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात शिवराम शिंदे, सरपंच सुप्रिया डाकी माळी,उपसरपंच श्री



चंद्रकांत भालेकर यांच्या उपस्थितीत रा.जि.प. शाळा पळस येथील मुलांना खाऊ वाटप,विभागातील वयोवृद्ध नागरिकांचा सत्कार,विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. तसेच घरकुल योजनेच्या माध्यमातून लाभार्थींना 05 ब्रास वाळूचे पास वाटप करण्यात आले. यावेळी शिवराम शिंदे यांनी खा.सुनील तटकरे यांनी आजपर्यंत लोकहिताची केलेल्या कार्याची माहिती देत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्यासाठी दीर्घायुष्याची प्रार्थना केली. सदरील कार्यक्रमाला माजी सरपंच निष्ठा विचारे,माजी सरपंच हिराजी शिंदे, माजी सरपंच मारुती शिर्के यांच्यासह ग्रा.पं.सदस्य यतीश डाळी यांच्यासह ग्रामसेवक कांचन राऊत, तलाठी कुलकर्णी, संतोष वाघमारे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## गोंदिया -स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था गोंदिया चे दुसरे वर्धापन दिवस सतनाम नशा मुक्ती केंद्र गोविंदपुर रोड

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**
**गोंदिया प्रतिनिधी**

गोंदिया येथे 9 जुलै ला साजरा करण्यात आला. सर्वप्रथम संत कबीर साहेब व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. लोकेश कुमार चिर्वतकर होते.



प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा.सचिन भाऊ बनसोड संस्था सचिव टी. वाय. चिर्वतकर तसेच कार्यकारिणी सदस्य सौ. सुनीता सव्वालाखे,रुतिका इलमकर व श्री सोनेवाने जी उपस्थित होते.

उपस्थित कार्यक्रम अध्यक्ष डॉ. लोकेश कुमार चिर्वतकर यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले तसेच भविष्यात संस्था गरीब लाभार्थींना विशेष सवलत देईल असे जाहीर केले उपाध्यक्ष सचिन भाऊ बनसोडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन सौ. सुनिता सव्वालाखे मॅडम यांनी तर आभार सौ.सारिका ब्राह्मणकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला ए. ए. ग्रुप, आत्मपरिचय समूह, नई सुबह, अल अनॉन समुह, मॉर्निंग समूहाचे सदस्य उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीकरिता कु. कीर्ती शिवणकर, मधूभाऊ राऊत , संजय मेंढे यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केले.

## रिठद ते ढोरखेडा रस्त्यावर गावाजवळील पुलावर खड्डेच खड्डे, दुरुस्ती होईल का?

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

**वाशीम** - रिसोड राज्यमार्ग क्रमांक ५१ ला लागुनच असलेल्या रिठद गावातून जात असलेल्या रिठद ते ढोरखेडा रस्त्यावर गावाजवळील पुलावर खड्डेच- खड्डे पडल्यामुळे पाऊस जास्त पडत

असल्याने नदीला पूर येतो.या पुलावरून वारंवार पुराचे पाणी वाहत आहे. त्यामुळे अनेक नागरिक या पुलावरून गावात जाण्याकरिता व बाहेरगावी जाण्यासाठी या पाण्यामधून ये - जा करतात

परंतु पाण्याच्या पातळी मध्ये पुलावरील खड्ड्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे ये-जा करणारे गावकरी तथा मोटर सायकलस्वार या पाण्यातून प्रवास करतात.त्यामुळे कुणीही वाहून जाऊ शकते व जिवीतहानी होऊ शकते. यासाठी मुख्यमंत्री सडक योजनेच्या अधिकाऱ्यांनी व संबंधित ठेकेदारांनी रिठद गावाजवळ असलेल्या अढळनदीच्या पुलावरील खड्ड्याची दुरुस्ती करावी. अशी मागणी रिठद गावकऱ्याकडून होत आहे.

## प्रभावी वकृत्व शैली महत्तवाची गुरुकिल्ली - मयुरेश नेतकर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

"उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी प्रभावी वकृत्व शैली ही एक अत्यंत महत्त्वाची गुरुकिल्ली आहे," असे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी केले.

महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेऱ्या सुरू आहेत. त्या अनुषंगाने स्पर्धा प्रमुख म्हणून आपले मनोगत व्यक्त



करताना म्हंटले.

ते पुढे म्हणाले की, "वकृत्वशैली" हा शब्द फक्त बोलणे किंवा भाषण देणे इतकाच मर्यादित नाही. हा शब्द आहे व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावशाली अभिव्यक्तीचा. भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर विचारांइतकीच त्यांची मांडणीही प्रभावी असली पाहिजे. आणि हीच ताकद आपल्याला वकृत्वशैली देते.

आजच्या युगात केवळ ज्ञान असून उपयोग नाही. ते ज्ञान आत्मविश्वासाने, संयमाने आणि योग्य शब्दात मांडता आलं पाहिजे. राजकारण असो, व्यवसाय असो, शिक्षण असो किंवा कोणतंही क्षेत्र वकृत्व हेच यशाचं द्वार उघडण्याचं साधन आहे. वकृत्व म्हणजे केवळ मोठ्या शब्दांत भाषण देणं नव्हे, तर समोरच्याच्या मनाला स्पर्श करणं, त्यांच्या भावना समजून घेऊन संवाद साधणं हाच खरा संवादाचा आत्मा असतो. आज आपण पाहतो की नेतृत्व हे प्रभावी संवादातून जन्म घेतं. उत्तम वक्ता हा केवळ श्रोत्यांचं लक्ष वेधून घेत नाही, तर त्यांच्या मनात विचारांची ठिणगीही पेटवतो.त्यामुळे शालेय जीवनापासून वकृत्वाची आवड निर्माण होणे गरजेचे आहे, आणि ते काम कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका करत आहे, असेही मयुरेश यांनी अधोरेखित केले.

# संत श्रीपादबाबांच्या जीवनावर आधारित लघुपट प्रदर्शित विकास वायाळ यांची प्रमुख भूमिका

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/ प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायातील तेजस्वी संत श्रीपादबाबा चव्हाण ( घोटी गाव तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक)यांच्या जीवनावर आधारित सत्यघटनेवर आधारित एक भावस्पर्शी लघुपट नुकताच 6 जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे पोस्टरचे उद्घाटन होऊन सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला. या लघुपटात संत श्रीपादबाबांची भूमिका लेखक सह दिग्दर्शक व अभिनेता विकास वायाळ यांनी प्रभावीपणे साकारली आहे. या लघुपटाचे दिग्दर्शक- श्री संजय कसबेकर सर यांनी केले असून, श्रीपादबाबांच्या भक्तिमय जीवनातील







संघर्ष, त्यांचे समाजासाठीचे योगदान आणि त्यागमय वृत्तीला प्रामाणिकपणे पडद्यावर उतरवले आहे. पारंपरिक वारकरी भावविश्व, भजन, कीर्तन, आणि भक्तिरसाने भरलेली ही कथा प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी ठरली आहे. लघुपटाचे सोशल मीडियावर प्रदर्शन होताच अनेकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, विशेषतः वारकरी भक्तांनी याचे स्वागत भक्तिभावाने केले आहे. नव्या पिढीला संतपरंपरेची जाणीव करून देण्यासाठी हा लघुपट एक महत्त्वपूर्ण माध्यम ठरत आहे.या लघुपटाचे पटकथा / संवाद /सहदिग्दर्शक लेखक श्री विकास वायाळ दिग्दर्शक- श्री संजय कसबेकर सर डी ओ पी- श्री धनराज वाघ सर कथा- ह भ प श्री बाळासाहेब महाराज चव्हाण ( घोटी) ह भ प श्री पुरुषोत्तम महाराज रायजाधव ( बदलापूर ठाणे) कलाकारसंत श्रीपाद बाबा श्री विकास वायळ,संत रामदास बाबा श्री पांडुरंग चिकणे, संत केरोबा बाबा श्री किरण गायकर, ह भ प मामासाहेब दांडेकर ह भ प श्री शिवाजी टेमकर,ह भ प कोंडाजी बाबा डेरे,ह भ प श्री धोंडीभाऊ शिंदे सर,संत गाडगेबाबा श्री अशोक वायळ,मा. ना. श्री यशवंतराव चव्हाण,श्री वैभव वायळ,सौ जाईबाई श्रीपाद चव्हाण,कादंबरी, सहकलाकार,कु श्रुतिका पाटील,कु चंदना झाडे,कु श्रावणी सुरेश हगवणे,कु,स्वरा वैभव वायाळ,श्री संतोष शिवदास आमले,श्री सुरेश भोईर विशेष आभार, श्री काळभैरवनाथ **पान २ वर**



# देवतुल्य आई -बाबा माझे गुरु...

दैनिक युवक आधार



आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरुपौर्णिमा म्हणून गौरवितो.आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. त्यांच्याएवढे श्रेष्ठ गुरुजी, आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी आपली श्रद्धा आहे. अशा या आचार्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे शास्त्रात कथन केले आहे. एवढेच नव्हे तर महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. ज्ञानियांचा राजा म्हणून ज्याला मानतात, त्या ज्ञानदेवांनीसुध्दा ज्ञानेश्वरी लिहिताना 'व्यासांचा मागोवा घेतू' असे म्हणून सुरुवात केली.व्यासपौर्णिमेच्या दिवशी 'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरुंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत.दत्तभक्तांसाठी हा पूण्यपावन दिवस ! या दिवशी शिष्य आपल्या गुरुची पंचोपचारे पूजा करतो. आपल्याला मिळालेल्या कृपादानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पूढील वाटचालीसाठी आशिर्वाद घेतो. वेगवेगळ्या पंथ व संप्रदाय हा इश्वरभक्तीकडे जाणारे मार्ग शोधणारे मुमुक्षु - पारमार्थिक या दिवशी भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात. रत्नागिरी जिल्हातील संगमेश्वर तालुक्यामधील श्रीक्षेत्र मार्लेश्वर परिसरातील आंगवली(रेवाळेवाडी ) हे माझे गाव.याच गावात माझा जन्म झाला.आई -बाबा शेतकरी.पण शेती काम करता करता त्यांनी मला खूप छान वाढवले. चांगलं शिक्षण दिले.आई हा नेहमीच सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. क्वचितच अशा व्यक्ती सापडतील ज्यांना आई विषयी माया नाही. अनेक लेखक आणि कवींसाठी आई हा असा विषय आहे कि जिच्यावर ते अनेक काव्य किंवा लेख लिहू शकतात. परंतु वडिलांवर काही भव्य दिव्य काव्य किंवा लेखन केलेलं कधी माझ्या वाचनात(काही अपवाद वगळता)आले नाही. आई हि मायाळू, दयाळू, प्रमाची मूर्ती सर्व काही आहे परंतु आपल्या जीवनात वडिलांचं काय स्थान आहे याबद्दल आपण जास्त विचार का नाही करत? वडिलांचा खंबीर आधार आहे म्हणूनच तर आपल घर उभं असत हे आपण किती सहजपणे विसरून जातो. वडील म्हणजे रागीट, कडक स्वभावाचे असेच चित्र बहुधा आपल्या मनासमोर उभे असते. मित्र-मैत्रिणींच्या घरी जाताना आई आहे म्हटलं तरी बिनधास्त जातो पण जर त्यांच्या घरी बाबा आहेत असं म्हटलं तर आपण सांगतो कि 'तू खालीच ये, बाहेरच भेटूया.' का असते वडिलांची एवढी भीती आपल्या मनात? मला वाटत याची सुरवात तेव्हापासून होते, जेव्हापासून घरातले सर्वजण सांगायला लागते 'पसारा आवर बाबा येतील, अभ्यास कर नाही तर बाबांना सांगेन, हे केलस तर बाबा ओरडतील, ते नाही केलस तर बाबा रागवतील.' हे सर्व टे आपल्याला शिस्त लावण्यासाठी करत असतील कदाचित पण त्यामुळे नकळत आपल्या मनात वडिलांविषयी आदर सोबत भीती सुद्धा तयार होत असते. ज्या गोष्टींसाठी आपण आईकडे बिनधास्त हट्ट करतो, बाबांना त्याविषयी विचारायला सुद्धा घाबरतो. स्वतः उन्हात जळून मला सावलीत बसवणारा देवदूत मी वडिलांच्या रूपात पहिला आहे. बाबा म्हणजे अपरिमित काळजी करणारं मन... स्वतःच्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेवून मुलांसाठी झटणारे अंतःकरण...माझ्या बाबांचे(लक्ष्मण गुणाजी गुडेकर )दि.८/४/१९९८ ला वयाच्या ७० व्या वर्षी तर आईचे ( गं.भा.जानकीबाई लक्ष्मण गुडेकर ) दि.३/३/२००८ रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले.बालपणी ऐकावी लागते ज्यांच्या धाकातील शब्दांची धार... मोठेपणी बाबांचे शब्द जीवन जगताना देतात आधार... आज(दि.१० जुलै ) गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ज्यांनी मला घडवले त्या आई -बाबा यांचे आभार मानतो.देवतुल्य बाबा माझे.. देवतुल्य आई... पुजा रोज करतो त्यांची अन्य देव नाही...!

शांताराम गुडेकर

**दै.अग्रलेख- मुंबई/कोकण विभागीय संपादक**
**विक्रोळी (पश्चिम ), मुंबई -७९**
**भ्रमन ध्वनी - ९८२०७९३७५९**

# गावाच्या विकासाची दोर आता 40 कारभारणीच्या हाती

## तालुक्यातील राजकारण : तापणार रिसोड तालुक्यातील आरक्षण घोषित .

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**: रणजीत सिंह ठाकुर.**

... रिसोड तालुक्यातील 80 ग्रामपंचायतीचे आरक्षण घोषित करण्यात आले. यामध्ये 40 ठिकाणी महिलांना आरक्षण देण्यात आले असून सदर आरक्षण सोडत साठी दिनांक 9 जुलै रोजी रिसोड तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या अध्यक्षतेखाली तथा तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर नायब तहसीलदार जवादे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आरक्षण सोडत संपन्न झाली. या आरक्षण सोडतीसाठी रिसोड तालुक्यातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य



व अन्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर आरक्षण सोडतीमध्ये

**सर्वसाधारण**
लिंगा कोतवाल, गणेशपुर रि, मोठेगाव,देऊळगाव बंडा, मोहोजा इंगोले, कवठा खुर्द, केनवड, करडा, निजामपूर, मांडवा, बाळखेड,पिंपरखेड,येवती, मोरगव्हन, कोयाळी बु के, मांगुळ झनक, बिबखेडा.

**सर्वसाधारण स्त्री**
गोहगाव, वनोजा, शेलगाव राजगुरे, येवता, भर जहागीर, चिंचांबा पेन, गोभणी, आंचळ,नेतंसा, एकलासपूर, केशवनगर, आगरवाडी, वाघी खुर्द, जवळा,मांगवाडी, घोणसरवाडी, बेलखेड, गोवर्धन.

**अनुसूचित जाती**
हिवरा पेन, आसेगाव पेन, दापुरी खुर्द, किनखेडा, लोणी बु, घोटा, महागाव, हराळ,चिखली, चाकोली,

**अनुसूचित जाती महिला**
जोगेश्वरी, पेनबोरी, मोप, लोणी खुर्द, वडजी, गोंडाळा, पिंपरी सरह, सवड, नावली.

**नामाप्र**
व्याड ,नंधाना, रिठद, खडकी सदार,वाडी रायताळ, कंकरवाडी,चिंचांबाभर, करंजी, लेहणी,पार्डी तिखे, कळमगव्हाण

नामाप्र महिला
कोयाळी बु री, मोजाबंदी, पळसखेड, धोडप खुर्द,देगाव, भापूर जाम आढाव, बोरखेडी, कुकसा, कुऱ्हा शेलु खडसे,

**अनुसूचित जमाती**
कोयाळी खुर्द री,धोडप बु

अनुसूचित जमाती महिला
मसला पेन वाकद

# आषाढ पौर्णिमा वर्षवास निमित्ताने विजय नंदागवळी यांचे कडून फळदान

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** आषाढ पौर्णिमा वर्षवास निमित्ताने उपजिल्हा रुग्णालयात सर्व भरती असलेल्या रुग्णांना विजय नंदागवळी माजी सहा. वाहतूक अधीक्षक भंडारा यांचे कडून फळदान करण्यात आले. तथागत सम्यक संबुद्ध यांनी सांगितल्या प्रमाणे आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा निमित्ताने वर्षवास कार्यक्रम बुद्ध विहारात आयोजित केला जातो या निमित्ताने बरेच उपासक उपसिका उपोसद धारण करतात, व या कालावधीत विहारात बुद्धधम्माचे ज्ञान दिले जाते त्यामुळे सुसंस्कृत होऊन भविष्यात जीवन जगण्याचा अर्थ कळतो त्याच औचित्य साधून आज फळदान करण्यात आले. त्या प्रसंगी रुग्णालयात फळदान करतांना विजय नंदागवळी, छाया नंदागवळी, भावेश कोटांगले, मनोज कोटांगले, शरद रंगारी, डी.जी.रंगारी, बिट्टू गजभिये,ताराचंद भैसारे, शालू कोटांगले, संकल्प कोटांगले, आरुष कोटांगले, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका उपस्थित होते.



# जिल्हा कारागृहात बंदिस्त कैद्यांची क्षयरोग तपासणी.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**रणजीत ठाकूर**

**वाशिम ;** आज दिनांक 10/07/25 रोजी जिल्हा कारागृह वाशीम येथे टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत निर्मूलन करिता "टी बी हरेगा - देश झिंकेगा" या ब्रीद वाक्याला अनुसर व जिल्ह्यामध्ये टीबीमुक्त साठी विविध उपाय योजना राबविल्या जात आहेत.त्याच अनुषंगाने आज, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्य चिकित्सक मा डॉ अनिल कावरखे,




जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश परभणकर,जिल्हा हिवताप अधिकारी डॉ रामहरी बेले, अधीक्षक अमृत आगाशे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी मोहन पाटील, तुरुंग अधिकारी राजेंद्र राठोड,यांचे मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ विजय गोटे यांचे सहकार्याने बंधीस्त असलेल्या व्यक्तीपैकी संशयित क्षयरुग्णाची डिजिटल एक्स रे मशीन द्वारे तपासणी करण्यात आली. क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी वैभव रोडे यांनी 54 पुरुष व 06 महिला कैदी व्यक्तीचे एक्स रे काढले. यावेळी बंदिस्त काही त्यांना क्षयरोग संदर्भात मार्गदर्शन करून टीबी लक्षणे संसर्ग या आजारा संदर्भात जागृत केले. या वेळी उपचार पर्यवेक्षक रामेश्वर सोनुने,वाहनचालक गणेश राऊत, परिचर मनीष जाधव तसेच जिल्हा कारागृहाचे सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सर्व उपस्थितांना क्षयरोग, डेंग्यू बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले. शिबीराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले.

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात "गुरुपौर्णिमा"मोठ्या उत्साहात साजरी.

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कला विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत अभिवादन केले. हा कार्यक्रम इयत्ता 10वी ब च्या विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या घडवून आणला. यावेळी विद्यालयातील, जाधव स्नेहल, शिंदे रसिका, प्रतिक्षा जाधव, पद्मनाभ आभाळे (10ब ) सिद्धी बंद्रे, धनश्री वाळेकर(6क)या विद्यार्थ्यांनी भाषणातून गुरु विषयीचे आपले मत



व गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी व्यक्तिला आपल्या आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर,एक तरी गुरु असावा असे मत व्यक्त केले. तसेच विद्यालयाचे उप मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी विद्यार्थ्यांना गोष्टीतून गुरूचे महत्त्व समजावून सांगताना"जे जे चांगले ते ते घ्यावे व जे जे ते नको ते सोडावे " असा गुरुमंत्र दिला. सदर कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा यथोचित सत्कार करून आपली गुरु विषयीची कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रावणी गोराडे व धनश्री पुंड यांनी केले, भक्ती चेवले हिने उपस्थित सर्वांचे आभार मानले.सदर कार्यक्रमास विद्यालयाचे पर्यवेक्षक माळी एस टी,चांदे आर के लाईफ मेंबर रयत शिक्षण संस्था, सातारा विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते

## संत श्रीपादबाबांच्या जीवनावर आधारित लघुपट प्रदर्शित विकास वायाळ यांची प्रमुख भूमिका

**पान १ वरून**

फिल्म प्रोडक्शन,दादासाहेब फाळके चित्रपट युनियन,अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ,अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद मीडिया पार्टनर -दैनिक युवक आधार ,आषाढी एकादशी निमित्त रविवार दिनांक 6 जुलै रोजी वारकरी संत श्रीपाद बाबा एका सत्य कथेवर आधारित चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे आपण पाहू शकता यूट्यूब चैनल VIKAS WAYAL वरती सर्वांनी सदर लघु चित्रपटाची युट्युब लिंक लाईक, शेअर, सबस्क्राईब करा फेसबुक इंस्टाग्राम व्हाट्सअप ग्रुप सर्वीकडे शेअर करा शक्य असल्यास सदर लघु चित्रपटाचा पोस्टर व लिंक डीपी स्टेटस ला ठेवा असे आव्हान अभिनेता विकास वायाळ यांनी केले

# न्हावा शेवा टप्पा क्रमांक ३ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यातही तातडीने कार्यवाही करा- आ.प्रशांत ठाकूर व आ. महेश बालदी यांची मागणी

## योजना विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणाच्या स्तरावरून आवश्यक पाठपुरावा - पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (प्रतिनिधी)**

पनवेल तालुक्यातील न्हावा शेवा टप्पा क्रमांक ३ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे केली. या योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी मार्च २०२६ पर्यंत भाववाढीशिवाय मुदतवाढ मंजूर करण्यात आली असून योजनेची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावरून आवश्यक पाठपुरावा करण्यात येत आहे, असे लेखी उत्तर पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. पनवेल तालुक्यातील न्हावा शेवा टप्पा क्र. ३ पाणीपुरवठा योजना काही तांत्रिक अडचणीमुळे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. या पाणी पुरवठा योजनेचा कार्यादेश डिसेंबर २०२० मध्ये देण्यात आला असून काम पूर्ण करण्याची मुदत ३० महिन्यांपर्यंत असताना योजना कार्यान्वित न झाल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रास पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे सदर न्हावा शेवा टप्पा क्र. ३ पाणी पुरवठा योजना तातडीने कार्यान्वित करुन पनवेल महानगरपालिका हद्दीतील पाणी टंचाई दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता. या प्रश्नावर पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी लेखी उत्तर दिले. त्यांनी दिलेल्या उत्तरात सांगितले कि, न्हावा शेवा टप्पा क्रमांक ३ पाणीपुरवठा योजना काही तांत्रिक अडचणीमुळे अपूर्ण असल्याची बाब खरी आहे. कोवीड-१९ हया साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे, मशीनरी, मनुष्यबळ उपलब्धता व हालचालीवर आलेली बंधने, मर्यादा, निविदा कार्यादेशानंतर स्टील साहित्यांच्या दरात झालेली असाधारण भाववाढ व त्यामुळे पाईप पुरवठा करण्यास कंत्राटदाराकडून झालेला विलंब, पळस्पेफाटा ते भोकरपाडा दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्ग लगतची अतिक्रमणे, कोवीड १९ च्या लॉकडाऊन पर्यंतच्या कालावधीत जागेच्या भू-संपादनाच्या कार्यवाहीस झालेला विलंब, जागेचा मोबदला न मिळाल्याने जलवाहिन्या टाकणेस संबंधित जागा मालकांचा अडथळा व रेल्वे, एक्सप्रेस वे, टोल प्लाझा क्रॉसिंग आणि ओएनजीसी परिसरातून जलवाहिनी टाकण्यास ओएनजीसीने परवानगी नाकारणे, अशा बाबींसोबत ठेकेदार में. जी.व्ही.पी. आर. इंजिनिअर्स हैद्राबाद यांचेकडून नियोजनानुसार काम होत नसल्याने निदर्शनास आले असून संबंधित या ठेकेदारावर दंडात्मक कारवाई सुरु आहे. नवी मुंबई येथील झालेल्या नवीन विमानतळामुळे सभोवतालच्या परिसरामध्ये झालेल्या व होत असलेल्या विविध संस्था जसे की, राष्ट्रीय महामार्ग, एमएमआरडीए, एमएसआरडीसी यांचे मार्फत सुरु असलेल्या रस्ते प्रकल्पामुळे योजनेतून टाकण्यात आलेल्या पाईपलाईनचे स्थलांतरण करणे अपरिहार्य होत आहे. पर्यायाने पूर्ण योजनेच्या भौतिक व आर्थिक गोष्टीवर बंधने येत असून कामास विलंब लागत आहे. सद्यःस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रास सद्यःस्थितीतील त्यांच्या मागणीनुसार पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी मार्च २०२६ पर्यंत भाववाढीशिवाय मुदतवाढ मंजूर करण्यात आली असून योजनेची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावरून आवश्यक पाठपुरावा करण्यात येत असून सद्यःस्थितीत योजनेचे काम सुरु असून प्रगतीपथावर आहे.

# नवीन जन्मास आलेल्या मुलींचे स्वागत व सामाजिक प्रबोधन कार्यक्रम संपन्न

## महिलांनो बचत गटाच्या माध्यमातून सक्षम व्हा - यशवंत देशमुख

दैनिक युवक आधार
उमरखेड तालुका प्रतिनिधी
राजू गायकवाड

ग्रामपंचायत मोहदरी अंतर्गत आमचा गाव आमचा विकास उपक्रमाअंतर्गत गावामध्ये गेल्या 3 वर्षापासून जन्मलेल्या मुलीचा सत्कार आणि महिला बचत गटांना व्यवसाय व सामाजिक प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमात नवीन जन्मास आलेल्या मुलींना कपडे व त्यांच्या मातांना ब्लाउज पीस स्वरूपात आहेर करून त्यांचा सत्कार करण्यात आला आणि गावातील महिला बचत गटांना व्यवसाय व सामाजिक प्रबोधन कारण्यात आले यावेळी राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यशवंत देशमुख यांनी महिला संबोधित करताना सांगितले कि महिलांनी स्वतःच्या पायावर उभ राहावं आणि बचत गटाच्या माध्यमातून सक्षम व्हावं असे



सांगितले शिवाय मुलींनी माता सावित्री बनवा माता रमाई बनाव असा उपदेश दिला सदर कार्यक्रमाला महिला व बालकल्याण विभागाच्या प्रवेक्षिका उपस्थित होत्या त्यांनी ही महिलांना चांगले मार्गदर्शन केले सोबतच स्वच्छ भारत मिशन चे वाहुळे यांनी नियमित शौचालय चा वापर करावा असे सांगण्यात आले धनज येथील वकील मजर देशमुख यांनी महिला कायदेविषयक मार्गदर्शन केल सदर कार्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे पार पडला या कार्यक्रमाला राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंत देशमुख, सरपंच पुंजाबाई खोकले, सचिव किशोर सोनटक्के,अँड मजर देशमुख,अनाजी बोंबले,सखाराम खोकले विठ्ठल पवार, दिगंबर धुळे,सदस्य प्रभाबाई गव्हाणे,शंकर डाखोरे, महिला व बालकल्याण विभागाच्या व माविम च्या ममता पडघणे, शीतल उगले, योगिता बकेवार, दीपिका पाईकराव,माया मनवर, अल्का भागवत, स्वाती खाडे, शिलाबाई आवटे, प्रज्ञा भालेराव, करण कांबळे, कपिल डाखोरे,सचिन कांबळे,शिलानंद धुळे, संगीताबाई गव्हाणे, कविता खोकले, उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गायकवाड यांनी केले तर आभार अंगणवाडी सेविका वंदनाबाई श्रावणे यांना मानले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

युवक आधार



## कालिकादेवी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कंपनीत भरारी

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनीधी**

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा बी.कॉम द्वितीय वर्षात शिकणारा विद्यार्थी गांगर्डे बालासाहेब रामदास याने आपल्या मेहनतीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर नोकरी मिळवून महाविद्यालयाचे तसेच बीड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

बालासाहेब याची निवड "एशियन कंपनी" मध्ये इंट्री अकाउंटंट या पदावर झाली असून तो सध्या गिनी (WEST AFRICA) खंडातील कोणार्क शहरात कार्यरत आहे. ही नोकरी मिळवणे ही एक गौरवाची बाब असून, ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्याने आंतरराष्ट्रीय कंपनीत नोकरी मिळवणे हे प्रेरणादायक आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे , उप प्राचार्य डॉ. संजयजी तुपे , वाणिज्य विभाग प्रमुख प्रा . डॉ. ज्ञानेश्वर येवले , प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश आडगावकर व प्रा. डॉ. धम्मपाल घुंबरे प्रा. डॉ. नवनाथ पवळे यांनी बालासाहेबचे अभिनंदन केले असून त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# संवाद ज्येष्ठ नागरिक संघाचा माहीम येथे साप्ताहिक कार्यक्रम संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**

दि.८ जुलै २०२५रोजी संवाद ज्येष्ठ नागरिक संघाचा माहीम येथे साप्ताहिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला ग्रेसफुल लिविंग या ज्येष्ठांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या संस्थेला बोलवण्यात आले होते.

सर्वप्रथम "संवाद" च्या आणि "फेसकॉम" च्या कार्यकारणी सदस्य श्रीमती उज्ज्वल ताई पाठारे यांनी सर्वांचे स्वागत करून ग्रेसफुल लिविंग च्या तन्वी जाधव आणि संगीतोपचार तज्ञ श्री किशोर गोलतकर या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा परिचय करून दिला.

या वेळच्या कार्यक्रमाचा विषय होता "संगीतोपचार" म्हणजेच म्युझिक थेरपी. कार्यक्रमाला फेस्कॉम चे जनसंपर्क प्रमुख श्री दिलीप गाडेकर




यांची उपस्थिती लाभली.

आषाढी एकादशी नुकतीच झाली असल्यामुळे श्री किशोर गोलतकर यांनी कार्यक्रमाची सुरुवात अभंगापासून केली. ज्यांना ऐकू येते त्यांना संगीतोपचाराचा उपयोग होतो. प्राणी आणि वनस्पती हे सुद्धा संगीतोपचाराला प्रतिसाद देतात. डोळे बंद करून योग्य प्रकारे प्राणायाम केल्याने हृदयातील अनाहत नाद ऐकू शकतो. यामुळे आपले शरीर आणि मेंदू तंदुरुस्त राहतो. मन प्रसन्न होते असे श्री. गोलतकर यांनी सांगितले. चित्रपट गीत डोळे बंद करून ऐकल्याने आपल्या डोळ्यापुढे अभिनेता आणि तो चित्रपट दिसतो म्हणून नेहमी डोळे बंद ठेवून फक्त ध्वनी/सूर/ संगीत ऐकावे आणि विशेषतः आपल्या शरीराच्या प्रत्येक भागावर लक्ष केंद्रित करून ते ऐकल्याने आपले शरीराचे रोग सुद्धा बरे होऊ शकतात. आखडलेले स्नायू मोकळे होतात. त्यामुळे कुठल्याही औषधांची गरज पडत नाही असे श्री गोलतकरांकडून समजले. यामुळे एकाग्रता वाढून स्मरणशक्ती सुद्धा वाढते. दुःखी - दर्दभरी गाण्याची चाल बदलून आपण ती गाणी सकारात्मक कशी तयार करावीत याचे त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. आनंदी होण्यासाठी संगीत हे एकमेव माध्यम आहे कंटाळा आल्यावर आवडती - सकारात्मक गाणी ऐकावीत. डाव्या मेंदूप्रमाणे उजवा मेंदू सुद्धा कार्यशील कसा ठेवावा याचे प्रात्यक्षिक केले गेले. "मेंदूचे अभ्यंग स्नान" म्हणजे काय हे सर्वांना नव्याने समजले.

अशाप्रकारे संगीतोपचार पद्धती संबंधित त्यांनी फार सुंदररित्या माहिती दिली. संवादचे अध्यक्ष श्री सुधीर नाईक यांनी संगीतोपचार तज्ञ श्री. किशोर गोलतकर आणि ग्रेसफुल लिविंग च्या तन्वी जाधव यांचे आभार मानले.

कार्यक्रमाची सांगता श्रीमती उज्ज्वलताई पाठारे यांचा वाढदिवसानिमित्त त्यांच्यासाठी श्री किशोर गोलतकर यांनी वाढदिवसाचे गाणे म्हणून शुभचिंतन केली. तसेच संवादच्या सभासद सौ. स्वाती गोडबोले यांनी सुद्धा वाढदिवसा प्रित्यर्थ गाणे गाऊन शुभेच्छा प्रगट केल्या. अशाप्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.

## शिष्यवृत्ती परीक्षेत सार्थक जाधव नाशिक तालुक्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**



जि. प. प्राथमिक शाळा गंगावाडी ता.वेहेळगाव(केंद्र पळसे, ता. नाशिक) येथील विद्यार्थ्याने गुणवत्तेचे शिखर गाठले आहे. इयत्ता ५ वी. शिष्यवृत्ती परीक्षेत सार्थक निलेश जाधव याने उत्तम कामगिरी करत नाशिक तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सार्थकच्या या उल्लेखनीय यशामागे शाळेतील मार्गदर्शक शिक्षिका प्राची निलेश जाधव व कल्पना राजाराम ढिकले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मिता चौधरी (BEO, नाशिक) यांचेही विशेष पाठबळ मिळाले. तसेच केंद्रप्रमुख लक्ष्मण राठोड व विस्तार अधिकारी भाऊसाहेब जगताप यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. सार्थकच्या यशाचे खरे शिल्पकार म्हणजे त्याचे वडील व प्रमुख मार्गदर्शक निलेश रमेश जाधव यांचे सातत्याने मिळालेले पाठबळ. सार्थकच्या या घवघवीत यशामुळे गंगावाडी शाळेचे नाव उज्वल झाले असून परिसरात आनंदाचे वातावरण आहे. त्याचे पळसे केंद्रप्रमुख जगन जाधव व तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी देवकर मॅडम यांनी अभिनंदन केले.

## पत्नीच्या गळ्यावर ब्लेडने वार पतीवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगाव** :- शहरातील माता नगर परिसरात एक धक्कादायक प्रकार घडला असून, पतीने आपल्या पत्नीच्या गळ्यावर ब्लेडने वार करून गंभीर जखमी केले. ही घटना दि. ८ जुलै रोजी सकाळच्या सुमारास घडली. माता नगर येथे राहणाऱ्या प्रियंका उर्फ हर्षा प्रदीप पेंदाम (वय ३२) या महिलेवर तिचा पती प्रदीप नारायण पेंदाम (वय ४३) याने चारित्र्यावर संशय घेत ब्लेडने सपासप वार करून जखमी केले. या घटनेत हर्षा यांच्या गळ्यावर गंभीर घाव झाले. घटनेनंतर जखमी महिलेवर प्रथम राळेगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र, जखम गंभीर स्वरूपाची असल्यामुळे तिला यवतमाळ येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले.या प्रकरणी पुत्राने दिलेल्या माहितीनुसार, पती प्रदीप पेंदाम याच्याविरुद्ध भादंवि कलम ३२६ व ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास राळेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल मालटे करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पती-पत्नीतील वैयक्तिक वाद इतक्या टोकाला जाईल यावर नागरिकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

## आषाढी एकादशी निमित्त चिमुकले झाले वारकरी.जैन आयडियल कॉन्व्हेंट मध्ये वारकरी दिंडी सोहळा.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

अनसिंग: येथे जैन आयडियल कॉन्व्हेंट कॉन्व्हेंट मध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात नर्सरी ते चौथीपर्यंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. जैन आयडियल कॉमेंट मध्ये विविध विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या व विठ्ठल रुक्मिणीच्या विठ्ठल यांच्या वेषभूषा आकाश कोल्हेकर रुक्मिणी.यांची वेषभूषा गुंजन बैरागी. वेशभूषा परिधान करून सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे आयोजक उमेश सुरूशे सर शिक्षिका दिपाली निंबेकर.




मॅडम,गंगासागर नमूलवार मॅडम, सानिका गिरी मॅडम. तसेच प्राचार्य भाग्यश्री ठोंबे मॅडम. यांनी मार्गदर्शन केले व सर्व शिक्षक व शिक्षक तर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले हा सोहळा अतिशय उत्साहात व भक्तिमय वातावरण पार पडला.

## निवळी ग्रामस्थांच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार चव्हाण यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** -मुखेड तालुक्यातील मुक्रामाबाद पोलीस स्टेशन येथील लातूर जळकोट तालुक्यातील महा रावनकोळा गावचे भूमिपुत्र नवनिर्वाचित सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.राजकुमार चव्हाण साहेब व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मा.शंकरराव मोरे साहेब यांचा सत्कार करण्यात आला आहे पोलिस ठाणे अंतर्गत बाऱ्हाळी सर्कल मध्ये

निवळी गावच्या ग्रामपंचायत कार्यालयचे नवनिर्वाचित,सरपंच शिवसाब आप्पा मठपती, उपसरपंच संभाजी पाटील माळेगावे ,भारतीय युवक काँग्रेसचे तालुका सचिव संदीप पाटील नेवळे, गणेश बालाजी बिरादार, SBI कर्मचारी बालाजी ईबिदार, मारोती मामा वाघमारे रोवनकोळा, पोलिस टाईम्स न्युजचे पत्रकार प्रताप देवरे, दैनिक युवक आधार नांदेड पत्रकार पपु निवळीकर,





# बॉलीवुड चित्रपट सारखे बंटी आणि बबलीला पनवेल शहर पोलीसांनी ठोकल्या बेड्या आणि उकल केले 04 गुन्हे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

बॉलीवुड चित्रपट सारखे बंटी आणि बबलीला पनवेल शहर पोलीसांनी बेड्या ठोकल्या असून त्यांच्या कडून फसवणुकीचे चार गुन्हे उघडकीस आणले आहेत . यातील आरोपी पियुष भोसले नावाच्या माणसाने तक्रारदार सुनिल बडगुजर जे व्यवसायिक सोनार आहे त्यांना स्वस्त दरात सोने देतो असे आमीष देवुन त्या बदल्यात रोखीने रुपये 10,00,000/- महिला आरोपी मंदिपकौर हीला देण्यासाठी सांगुन तक्रारदार यांनी रक्कम दिल्यानंतर पियुष भोसले व त्याची सहकारी महिला दोन्ही आरोपी पसार झाले होते . सुनील बडगुजर यांना त्यांची फसवणुक झाली हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणेत तक्रार दिल्यानंतर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे यांनी गुन्हे प्रकटीकरणचे अधिकारी पोउपनि विनोद लभडे यांना दिला. पथकातील पोहवा परेश म्हात्रे व पोना विनोद देशमुख यांनी गुन्हयातील आरोपीचा तांत्रिक आणि गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढल्यानंतर माहे एप्रिल 2025 मध्येच दोन्ही आरोपीपैकी महिला आरोपी मंदिपकौर ही मिळुन आली. तेव्हा पोलीसांनी मंदिपकौर हीस भा. ना.सु.स. 35 (3) प्रमाणे नोटीस देवुन गुन्हयाचे तपासकामी हजर राहण्यासाठी समज देवुन सोडल्यानंतर महिला आरोपी मंदिपकौर हीने पुरुष आरोपी पियुष भोसले यांना पोलीस आपला शोध घेत आहे ही माहिती दिली. तेव्हा पोलीसांनी आपला पुन्हा शोध घेवु नये म्हणुन दोन्ही आरोपी पनवेल येथील त्यांचा राहते घर सोडून कोठे तरी अज्ञात ठिकाणी निघुन गेले. दोन्ही आरोपी पोलीस ठाणेत गुन्हयाचे तपासकामी हजर राहत नाही म्हणुन पोहवा परेश म्हात्रे व पोना विनोद देशमुख यांनी आरोपीचे पनवेल येथील राहते ठिकाणी जावुन अधिक माहिती घेवुन आरोपींचा अधिक तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढली असता आरोपी हे डोंबिवली येथील प्रतिष्ठीत सोसायटी लोढा पलावा येथे राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. प्राप्त बातमीबाबत पोउपनि विनोद लभडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे यांना दिल्यानंतर त्यांनी दोन्ही आरोपींचा अधिक शोध घेण्यासाठी पोलीस पथक तयार केले. पोलीस पथकाने मानपाडा पोलीस ठाणे येथील पोलीस पथकांच्या मदतीने दोन्ही आरोपींचा लोढा पलावा, फेस 02 येथील अरबानो इमारत मध्ये जावुन शोध घेतल्यानंतर दोन्ही आरोपी मिळुन आले आणि पोलीसांनी दोन्ही आरोपींना अटक करुन त्यांची पोलीस कोठडी प्राप्त केली. पोलीसांच्या तपासात असे निष्पन्न झाले की पुरुष आरोपीस यास अनेक जण पियुष भोसले सह श्रद्धानंद हरिश्चंद्र भोसले, जोएल व प्रमोद भोसले या नावाने ओळखतात. पोलीसांच्या अधिक तपासात दोन्ही आरोपींचा पनवेल शहर पोलीस ठाणेत फसवणुकीचा गु.र.नं. 508/2023 भादवि कलम 420 मध्ये तर पुरुष आरोपीचा पनवेल शहर पोलीस ठाणेत एन.एम.एम.टी कर्मचारीस मारहाण प्रकरणी गु.र.नं. 328/2024 भादवि कलम 353, 332, 427, 323, 504, 506 आणि सीबीडी, बेलापुर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गु.र.नं. 242/2024 भादवि कलम 120ब, 409, 420, 201, 467 या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचा जनतेला आवाहन आहे वरील आरोपींनी त्यांची देखील फसवणुक केले असल्यास त्यांनी पोलीसांशी संपर्क साधावे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ 02) प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त (पनवेल विभाग) भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शाकीर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशा), अभिजीत अभंग, पोउपनि विनोद लभडे, पोहवा अविनाश गंथडे, पोहवा नितीन वाघमारे, पोहवा परेश म्हात्रे, पोहवा महेंद्र वायकर,पोना विनोद देशमुख, पोना सम्राट डाकी, पोशि चंद्रशेखर चौधरी, मपोहवा ज्योती दुधाने व मपोशि साधना पवार यांनी केली आहे.

## चौल भोवाळेच्या डोंगरमाथ्यावर जागृत दत्तपीठात गुरुपौर्णिमेला भाविकांची अलोट गर्दी; चोरीप्रकरणी पोलिस अजूनही अपयशी

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

निसर्गरम्य चौल गावातील भोवाळे डोंगरावर वसलेले श्री दत्त मंदिर म्हणजे श्रद्धेचं केंद्रबिंदू मानलं जातं. डोंगराच्या पायथ्याशी उभं राहिल्यावर समोर हिरव्या वनश्रीने नटलेला डोंगर, सभोवती नारळी-फोफळीच्या बागा, खाडीचं मोहक दर्शन, तर दूरवर समुद्रकिनाऱ्याची निळसर रेषा असा मनमोहक नजारा दिसतो. जणू भक्ती आणि निसर्ग यांचा संगमच इथे पहायला मिळतो. दरवर्षी गुरुपौर्णिमेला हजारो भाविकांचा ओघ येथे असतो. यंदाही पहाटेपासून मुसळधार पावसातही हजारो दत्तभक्तांची उपस्थिती मंदिरात पाहायला मिळाली. डोंगरसदृश्य टेकडीवर साधारण पाचशे पायऱ्या चढून गेले की आध्यात्मिक स्थिरतेची अनुभूती देणारं हे पवित्र स्थळ आपली ओळख ठसवून जातं. दरवर्षी गुरुपौर्णिमेला हजारो भाविकांचा ओघ येथे असतो.



यंदाही पहाटेपासून मुसळधार पावसातही हजारो दत्तभक्तांची उपस्थिती मंदिरात पाहायला मिळाली. डोंगरसदृश्य टेकडीवर साधारण पाचशे पायऱ्या चढून गेले की आध्यात्मिक स्थिरतेची अनुभूती देणारं हे पवित्र स्थळ आपली ओळख ठसवून जातं. पायऱ्यांच्या सुरुवातीलाच श्री स्वामी समर्थ अक्कलकोट निवासी मठ, नंतर सद्गुरू

**ग्रामस्थ, मंदिर समिती, आणि भाविक यांची एकच मागणी – चोरीचा तपास लवकरात लवकर पूर्ण व्हावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी.**

बुरांडे महाराजांची समाधी, सत्चित आनंद साधना कुटी, हरे राम विश्रामधाम, हरे राम बाबांचे धुनीमंदिर, औदुंबर मठ अशा अनेक अध्यात्मिक स्थळांचा प्रवास करत शेवटी आपण अत्यंत देखणं आणि आधुनिकीकरण झालेलं श्री दत्त मंदिर गाठतो. या मंदिरातील दत्तमुर्ती ही त्रिमुखी आणि सहा हात असलेली पाषाणातील मूर्ती आहे, जी भक्तांच्या अढळ श्रद्धेचं प्रतिक बनली आहे. गुरुपौर्णिमा उत्सवात भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग गुरुपौर्णिमा ही दत्तसंप्रदायातील एक महत्त्वाची आणि पवित्र तिथी असून या दिवशी भक्त मोठ्या संख्येने मंदिरात येतात. यंदाही पावसाच्या सततच्या सरी असूनही मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला होता. विशेष महापूजा, भजन, कीर्तन, आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावकरी आणि सेवेकरी मंडळींच्या स्वयंसेवेमुळे सर्व व्यवस्था सुरळीत पार पडली. पण अजूनही एक जळजळीत प्रश्न अनुत्तरित...

श्रद्धेचा हा जागर साजरा होत असताना, या मंदिरात काही वर्षांपूर्वी घडलेली ४० किलो चांदीची चोरी अजूनही दत्तभक्तांच्या मनात अस्वस्थता निर्माण करत आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोर दिसूनही त्याचा तपास आजतागायत अपूर्णच आहे. स्थानिक रेवदंडा पोलिस ठाणे, तसेच रायगड जिल्हा पोलिस प्रशासनाकडून चोर पकडण्यात अक्षम्य अपयश आले आहे. यामुळे ग्रामस्थ आणि भाविकांमध्ये तीव्र नाराजी आहे."चोरीला न्याय मिळणार की नाही?"गेल्या अनेक वर्षांपासून या चोरीचा तपास रेंगाळलेला असून, पोलिस यंत्रणेंचा कार्यप्रदर्शनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ग्रामस्थ आणि मंदिर समितीचे सदस्य अनेक वेळा पाठपुरावा करून थकले आहेत, मात्र अजूनही नक्की चोर कोण? आणि चोरीचा माल कुठे गेला? याबाबत कुठलाही ठोस पुरावा किंवा कार्यवाही समोर आलेली नाही.

"गुरुपौर्णिमा उत्सवात भक्तांची श्रद्धा ठाम पण पोलिस यंत्रणेविषयी प्रश्न कायम ?चौल भोवाळे येथील श्री दत्त मंदिर हे नुसतं एक मंदिर नाही, तर श्रद्धेचं आणि भक्तीचं मूर्तस्वरूप आहे. या मंदिरात वर्षभर अनेक उपासक, साधक आणि श्रद्धावान भक्त येत असतात. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने येणाऱ्या हजारो भक्तांमध्ये दरवर्षी वाढ होत आहे, पण या सर्व उत्सवाच्या पार्श्वभूमीवर चोरीप्रकरणात पोलिसांची उदासीनता मात्र वेदनादायक आहे.

## सी. के. टी. विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी संचालिका वर्षा ठाकूर यांची प्रमुख मान्यवर म्हणून लाभली उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सी. के. टी. विद्यालयाच्या प्राथमिक विभागातील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुपौर्णिमाचे औचित्य साधून गुरु शिष्य परंपरा जोपासत अनोखी गुरुवंदना देण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थी नेहमीच आपल्या गुरुचे अनुकरण करत अनेक गोष्टी शिकत असतो. शिक्षकांबरोबरच पालकांचे संस्कार पाल्यासाठी महत्वाचे असून त्यामधून मुलांची अधिक प्रगती होत असते, असे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर यांनी यावेळी आपल्या भाषणात नमूद केले.

यावेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट करत आजचा हा दिवस म्हणजे गुरु प्रती आदर आणि सन्मान व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. पुढे त्या म्हणाल्या की, गुरुमुळे आयुष्यातील अज्ञानाचा अंधःकार दूर होतो. गुरु आपल्याला योग्य मार्गदर्शन आणि दिशा देऊन आयुष्य सुखकर जगायला शिकवतो.

यावेळी गुरुप्रती आदर व्यक्त करत




शाळेतील विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी, राज्यस्तरीय स्वच्छता मॉनिटर अभियानात मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल वर्षा ठाकूर यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांचे कौतुक केले. दरम्यान, मास्टरमाईंड, इंग्लिश मॅरेथॉन, ऑलिम्पियाड परीक्षा तसेच महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर तसेच किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप ऑल इंडिया डान्स स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवरील प्रावीण्य मिळवलेल्या विजेत्याचे कौतुक करून त्यांना गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला पालक प्रतिनिधी उपाध्यक्ष अनुराधा सुर्यवंशी, सचिव माधुरी धनावडे, मराठी माध्यम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी आदी उपस्थित होते.

# सेंट वेल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ, शेडूंग येथे गुरुपौर्णिमेच्या दिवशी पर्यावरणप्रेमी वृक्षारोपण

## पर्यावरण जागर व गुरुप्रती श्रद्धा यांचा संगम साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

सेंट वेल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ, शेडूंग, पनवेल येथे गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिनी वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात गुरुंच्या महत्त्वाचे स्मरण करत, पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने वृक्षारोपणाचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून सेंसर बोर्ड सदस्य आणि पर्यावरण अभ्यासक अभिजीत पाटील, पत्रकार साहिल रेळेकर, सामाजिक कार्यकर्ते गणेश थोरवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश कुमार सिंग, उपप्राचार्य डॉ. महरूफ बशीर, असिस्टंट प्रोफेसर प्रियंका मिरकुटे, पूजा मार्कांना, आश्लेषा मुळे, लायब्ररीअन पूजा खालपे, यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून श्री गणेश पूजन



व सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमात प्राचार्य डॉ. राजेश कुमार सिंग यांनी आपल्या प्रभावी मार्गदर्शनात सांगितले, गुरुपौर्णिमा हा दिवस गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आहे. शिक्षण देणाऱ्या गुरूंप्रमाणेच निसर्गसंपत्ती जपणं हीसुद्धा आपली जबाबदारी आहे. झाडं लावणं म्हणजे भविष्याची गुंतवणूक आहे. तर उपप्राचार्य डॉ. महरूफ बशीर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले, गुरू ज्ञान देतात आणि वृक्ष जीवन देतात. या दोघांची जोपासना हीच खरी गुरुपौर्णिमा साजरी करणे आहे. विद्यार्थी जीवनात असे उपक्रम आत्मसात करणे काळाची गरज आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी पर्यावरण अभ्यासक अभिजित पाटील यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना विधी शाखेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पर्यावरणाचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य व जबाबदारी आहे. संस्थेतील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना विशेषकरून पर्यावरण कायद्यातील तरतुदी लक्षात घेऊन सजग राहणे आवश्यक आहे. रायगड, नवी मुंबईतील वाढती विकासकामे लक्षात घेता समाजात पर्यावरणाविषयक जागरूकता आणणे हे आपले परमकर्तव्य असले पाहिजे. तसेच आजच्या काळात गुरूंची शिकवण आणि वृक्षांचे महत्त्व समान आहे. गुरू जसे जीवन समृद्ध करतात, तसेच झाडेही पर्यावरण समृद्ध करतात. दोघांनाही जपणे हेच काळाचे खरे भान आहे, असे सांगून उपस्थितांचे पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष वेधले. पत्रकार साहिल रेळेकर यांनी आपल्या मनोगतातून वृक्ष हे केवळ प्राणवायू देणारे नाहीत, ते आपल्या अस्तित्वाचं मूळ आहेत. वाढते शहरिकीकरण, जंगलतोड, मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाचा समतोल बिघडत आहे. आज गुरुपौर्णिमा आहे. पौर्णिमा म्हणजे पूर्ण चंद्र आणि गुरू म्हणजे त्या चंद्रासारखा. जो स्वतः झळाळतो आणि इतरांचे जीवन प्रकाशमान करतो. जगातल्या सर्व यशस्वी लोकांच्या पाठीमागे एखादा न दिसणारा गुरू असतो. जसे श्रीकृष्णाच्या पाठीमागे संदीपनी होते, छत्रपती शिवरायांच्या पाठीमागे दादोजी होते, प्रभू श्रीरामाच्या पाठीमागे वशिष्ठ होते, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वप्निल मुकादम आणि शेखर अकुल यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्वप्निल भोवड यांनी केले. वृक्षारोपण करताना विद्यार्थ्यांनीही भरभरून सहभाग घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याने झाड लावताना त्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. या उपक्रमामुळे महाविद्यालयीन परिसरात फक्त हिरवळच नाही, तर शाश्वत विकासाची एक नवी पालवी फूटली. गुरुपौर्णिमा आणि पर्यावरण यांचा हा संगम उपस्थितांसाठी एक प्रेरणादायी अनुभव ठरला.

## भिवंडी लोकसभा क्षेत्राचे खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनी रेल्वे प्रश्नासंदर्भात घेतली मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांची भेट

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.गौरव खरे मुरबाड**

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT)येथील मध्यरेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्या दालनात एक विशेष बैठक घेण्यात आली.या बैठकीत भिवंडी लोकसभा मतदारसंघातील नागरिकांच्या रेल्वेसंबंधी अडचणी सुरक्षितता आणि पायाभूत सुविधानंचा अभाव या बाबी गंभीर्याने मांडण्यात आल्या.विविध गावांमधील स्थानिक पातळीवरील समस्या आणि उपनगरीय रेल्वे सेवा सुधारण्यासाठी 16महत्वाच्या मागण्यांचे निवेदन महोदयांना देण्यात आले.त्यामध्ये डोंगराळी व मालोडी (बंगलपाडा )येथे अंडरपास ओव्हरब्रिज मंजुर करने.भिवंडी दिवा मोमू लोकलसेवा तात्काळ सुरु करावी.गुरवली (टिटवाळा -KHADVALI)दरम्यान नवीन रेल्वेस्थानक उभारावे.कल्याण कसारा व बदलापुर मार्गीकेच्या कामास गती द्यावी.कल्याण रिमॉडेलिंग प्रकल्प त्वरित पूर्ण करावा.भिवंडी स्थानाकाचा अमृतभारत योजनेअंतर्गत समावेश करावा.सर्व स्थानकांवर स्वछतागृहांची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.कर्जत कसारा व खोपोली मार्गांवरील लोकल सेवा वाढवावी. मुंब्रा रेल्वे अपघातातील प्रवाशांना तात्काळ मदत व भरपाई द्यावी. कसारा ते मुंबई (पहाटे )व मुंबई ते कसारा (रात्री )दरम्यान नवीन लोकल चालू करा.लोकल गाड्या नियोजित वेळेनुसार चालवाव्यात. मेल एक्स्प्रेस ला आधी प्रधान्य टाळावे.प्रवाशी संघटनाच्या तक्रारीची गंभीर्यानी दखल घेऊन अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा करावी.प्रत्येक लोकल ट्रेन मध्ये 15डब्यांचा समावेश करावा. कल्याण कसारा मार्गीकेतील भुसंपादनातील अडथळे दूर करावेत व पुनर्वसनासाठी मोबदला द्यावा.रेल्वे सुरक्षा सुविधाचा दैनंदिन प्रवास सुखकर व्हावा यासाठी नियोजनबद्ध विकास करण्यात यावा.वरील बैठकीला मांडलेल्या प्रत्येक मुद्द्यासंदर्भात मध्य रेल्वे प्रशासन सकारात्मक असुन त्यासंदर्भात मध्य रेल्वे प्रशासनाकडून लवकरच आवश्यक त्या उपाययोजना होणार असल्याचे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांनी अश्वस्त केल्याचे खासदार बाळ्या मामा म्हात्रे यांनी सांगितले.




## गुरुपौर्णिमेनिमित्त पनवेल परिसरातील विविध मंदिर, मठात भक्तांची मंदीयाळी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त पनवेल पंचकोशीत असलेल्या विविध मंदिर, मठात भक्तांची मंदीयाळी उसळली होती .

शहरातील श्री स्वामी समर्थ मठ मंदिर ,गावदेवी पाडा ,रेल्वे स्टेशन मार्गावरील श्री साई नारायण बाबा मंदिर , दुर्गामाता मंदिर , इच्छापूर्ती गणेश मंदिर , लाईन आळी येथील मारुती मंदिर , नवनाथ मंदिर आदी ठिकाणी आज पहाटे पासूनच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . अनेक ठिकाणी काकड आरती, होम, हवन ,पूजा अर्चा ,महाआरती ,महाप्रसाद ,भजन- किर्तने यांचे आयोजन आज सकाळ पासुन करण्यात आले . अनेक ठिकाणी आकर्षक फुलांची आरस ,सजावट तर काही ठिकाणी सुंदर अश्या रांगोळ्या काढून श्री दत्त महाराजांचे दर्शन देण्यात आले होते . या सर्व धार्मिक कार्यक्रमाला भक्तांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता .



## हरियाणा सिरसा येथून आलेले शनिभक्त गर्ग यांच्याकडून मंदिर परिसरात केळी वाटप



**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी:-** हरियाणा येथून आलेले शनी भक्त अशोक गर्ग यांनी आज शनी शिंगणापूर येथे दर्शनास आले असता गुरुपौर्णिमा निमित्त मंदिर परिसरात केळी वाटप करण्यात आले.

## बँक खात्यातून 45 हजार रुपये काढून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

एटीएम मशीन मधून पैसे काढत असताना एटीएमची अदलाबदली करून बँक खात्यातून 45 हजार रुपये काढून फसवणूक केल्या प्रकरणे अनोळखी ईसमाविरोधात सात जुलै रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साजन औरंग हे पाटीलवाडी शिवमंदिर जवळ, पनवेल येथे राहत असून चार जुलै रोजी ते एटीएम मशीन मध्ये पैसे काढण्यासाठी संध्याकाळी गेले. सुरुवातीला दोन वेळा पैसे काढले मात्र तिसऱ्यांदा पैसे काढताना पैसे आले नाहीत. त्यावेळी त्यांच्या मागे असलेल्या अनोळखी इसमाने त्यांचा कोड नंबर पाहिला. यावेळी त्याने त्यांच्याकडून एटीएम घेतले आणि त्याच्या जवळील बनावट एटीएम कार्ड साजन यांना दिले. ते एटीएम कार्ड घेऊन घरी आले. त्यानंतर पाच जुलै रोजी रात्री बाराच्या सुमारास पैसे काढल्याचे मेसेज त्यांना आले. त्यांनी एटीएम कार्ड पाहिले असता ते त्यांचे नव्हते. त्या अनोळखी इसमाने कार्ड बदलून दिले होते.

## महात्मा गांधी विद्यालयाचे शिक्षक रफिक पठाण सेवानिवृत्त

### मान्यवरांच्या उपस्थितीत सेवागौरव सोहळा उत्साहात संपन्न.




**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

पाटोदा तालुक्यातील नायगाव मयुर येथील महात्मा गांधी विद्यालयातील शिक्षक रफिक पठाण वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा शाळेच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत सेवापुर्ती कार्यगौरव करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक मा.रामकृष्ण बांगर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश कवठेकर यांची उपस्थिती होती. या प्रसंगी झालेल्या मनोगत व्यक्त करताना रफिक पठाण यांच्या सेवाकाळातील जुन्या आठवणींना शिक्षकांनी उजाळा दिला. तर रफीक पठाण हे विद्यार्थी प्रिय शिक्षक असल्याचे गौरवोद्गार काढले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रकाश कवठेकर यांनी महात्मा गांधी विद्यालयातील शिक्षक रफिक पठाण यांचा सत्कार केला. या वेळी सरपंच मंजुषा कवठेकर, ह.भ.प.शिवाजी महाराज येवले, शिक्षक संघटनेचे डि.जी.तादळे सर, माजी सरपंच अशोक सुपेकर, तुकाराम मोहोळकर, माजी सरपंच सय्यद शाहिद, छाया शिंदे, येवले, सानप, तुपे, सांगळे, दिलीप कंठाळे, वारभवन सर, डोईफोडे सर, पठाण सर, चोले सर यांच्या सह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमेनिमित्त ईरा नेक्सस इंटरनॅशनल स्कूल, सिल्लोड येथे प्रेरणादायी सभेचे आयोजन



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** – गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ईरा नेक्सस इंटरनॅशनल स्कूल, सिल्लोड येथे विद्यार्थ्यांमध्ये गुरूंच्या प्रतिमेस वंदन करत, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या अतूट नात्याला समर्पित एक प्रेरणादायी सभा संपन्न झाली. या कार्यक्रमात गुरूंच्या मार्गदर्शनाचे आणि त्यांनी दिलेल्या ज्ञानाच्या प्रकाशाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना आणि श्लोक पठणाने झाली. विद्यार्थ्यांनी 'गुरू' या संकल्पनेवर आधारित एक सुंदर नाट्यप्रयोग सादर केला, ज्यामधून शिस्त आणि आदर या मूल्यांचे महत्त्व प्रभावीपणे मांडले गेले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ईरा ग्रुप ऑफ स्कूल्स चे संचालक श्री. सिद्धेश्वर आहेर सर उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले: "गुरू केवळ ज्ञान देणारे नसून शिस्त, मूल्ये आणि जीवन जगण्याची योग्य दिशा देणारे असतात. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूविषयी नेहमीच आदरभाव ठेवावा." कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि विद्यार्थी वर्ग यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गातच गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी ग्रीटिंग कार्ड्स तयार केली आणि गुरुपौर्णिमा साजरी केली.

ही गुरुपौर्णिमा विद्यार्थ्यांच्या मनात 'गुरू आणि शिस्त' या मूल्यांची अमिट छाप सोडणारी ठरली.

# टाटा टेक्नॉलॉजीज - इमर्सन यांची भागीदारी

## जगभरातील ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस आणि व्यावसायिक वाहनांसाठी वैधता उपाय शोधण्यासाठी धोरणात्मक सहकार्य

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,वार्ताहर**

जागतिक उत्पादन अभियांत्रिकी आणि डिजिटल सेवा कंपनी टाटा टेक्नॉलॉजीज (एनएसई: टाटाटेक) आणि प्रगत ऑटोमेशन सोल्यूशन्समध्ये औद्योगिक तंत्रज्ञान नेते इमर्सन (एनवायएसई: ईएमआर) यांनी आज संयुक्तपणे ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस आणि व्यावसायिक वाहन क्षेत्रातील जागतिक OEMS साठी एकात्मिक चाचणी आणि वैधता उपाय शोधण्यासाठी धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. टाटा टेक्नॉलॉजीजच्या सिस्टिम्स इंजिनीअरिंग, E/E आर्किटेक्चर्स आणि मोबिलिटी प्लॅटफॉर्म विकासातील सखोल तज्ञता आणि एमर्सनद्वारे सॉफ्टवेअर-कनेक्टेड टेस्टमधील प्रगत चाचणी व परिमाणन उपाय यांचा संगम करून, ही भागीदारी उत्पादकांना वाढत्या जटिल सॉफ्टवेअर-परिभाषित, कनेक्टेड, इलेक्ट्रिक आणि स्वायत्त वाहनांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम करेल, ज्यामुळे विकासाला गती मिळेल




आणि स्पर्धात्मक उत्पादने बाजारात आणण्यासाठी खर्च कमी होईल. भारतात, युरोप आणि उत्तर अमेरिकेत पायलट कार्यक्रम सुरू आहेत, आणि दोन्ही कंपन्या आगामी ग्राहक सहकार्ये व संयुक्त समाधान विकासाची योजना आखत आहेत, जेणेकरून सॉफ्टवेअर-परिभाषित जगात ग्राहकांना स्पर्धात्मक उत्पादने वितरित करता यावीत. टाटा टेक्नॉलॉजीजचे अध्यक्ष आणि ऑटोमोटिव्ह सेल्सचे प्रमुख नचिकेत परांजपे यांनी सहकार्याबद्दल उत्साह व्यक्त केला,"कनेक्टेड, ऑटोनॉमस आणि सॉफ्टवेअर-परिभाषित मोबिलिटी प्लॅटफॉर्मच्या वाढत्या जटिलतेला तोंड देणाऱ्या बुद्धिमान, स्वयंचलित चाचणी आणि प्रमाणीकरण उपायांसाठी इमर्सनसोबत सहयोग करण्यास आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी सॉफ्टवेअर-परिभाषित भविष्याची अभियांत्रिकी करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते, ज्यामुळे OEM ला जलद नवोन्मेष करण्यास मदत होते आणि कनेक्टेड, स्वायत्त व शाश्वत मोबिलिटीद्वारे उत्कृष्ट ग्राहक अनुभव देण्यास मदत करते." शितेंद्र भट्टाचार्य, प्रमुख-संचालक, इमर्सन चाचणी आणि मापन व्यवसाय म्हणाले,"एकत्रितपणे, आम्ही एंड-टू-एंड सोल्यूशन्स वितरित करू शकतो जे ग्राहकांना जटिलता कमी करण्यास आणि अत्यंत गतिमान वाहतूक परिदृश्यात पुढे राहण्यास मदत करतात. हे सहकार्य इमर्सनच्या चाचणी आणि मापन नवोपक्रम आणि टाटा टेक्नॉलॉजीजच्या अभियांत्रिकी स्केलमधील एक शक्तिशाली समन्वय दर्शवते."

## पोलिसच निघाला दुचाकी चोर!

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**



बीड -मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेले बीड पोलीस दल पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. ड्रीम इलेव्हणं सारख्या बेटिंग ऍप वर पैसे गमवलेल्या एका सहायक फौजदाराने चक्क दुचाकी चोरी केल्याचे उघड झाले आहे. त्याला अटक झाली आहे. विशेष म्हणजे या पोलीस अधिकाऱ्याने यापूर्वी पोलीस अधीक्षक कार्यालयातील बॅटऱ्या चोरल्या होत्या. आता त्याचे हे प्रकरण उघडकीस आल्याने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे. ड्रीम एलेव्हन व रमी अपमध्ये पैसे बुडाले. लोकांकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी हा पोलिस चोर बनल्याचे तपासात समोर आले आहे. त्याच्यासोबत आणखी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने उशिरा केली. अमित मधुकर सुतार (वय ३५, रा. खोकरमोहा, ता. शिरूरकासार), स्वराज कोंडीराम बोबडे (२६, रा. अंबिका नगर, बीड) आणि हितोपदेश गणेश वडमारे (३०, रा. अंकुशनगर, बीड) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. यातील सुतार हा सहायक फौजदार असून, पोलिस अधीक्षक कार्यालयातील वायरलेस विभागात कार्यरत होता. २४ डिसेंबर २०२४ रोजी सुतार याने इन्व्हर्टरसाठी लागणाऱ्या १० बॅटऱ्या चोरल्या. त्याच्याविरोधात बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर अधिक तपास केल्यावर त्याच्याकडे तब्बल ५८ बॅटऱ्या निघाल्या. शिवाय एक एलईडी टीव्हीही चोरला होता. सुतारला तेव्हा अटकही झाली होती. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी त्याचे निलंबनही केले होते. तो सध्या जामिनावर होता. परंतु त्याला जुगार, दारू, ऑनलाइन जुगार, गेम खेळण्याचा छंद होता. यात त्याने हजारो रुपये गुंतवले होते. काही लोकांकडून कर्जही घेतले होते. हे पैसे परत करण्यासाठीच त्याने चोरीचा मार्ग अवलंबल्याचे सांगण्यात आले.

**दुचाकी विक्रीसाठी दोघांची मदत**

सुतार याने बीड शहर दोन व शिवाजीनगर पोलिस ठाणे हद्दीतून चार दुचाकी चोरल्या. त्या विक्रीसाठी त्याने स्वराज आणि हितोपदेश यांची मदत घेतली होती. हीच माहिती एलसीबीला मिळाली आणि त्यांनी सापळा रचून तिघांनाही बेड्या ठोकल्या. सुतारने तीन दुचाकी स्वतःच्या घरी, चार मित्राकडे लपवल्या होत्या. त्याच्याकडून आतापर्यंत सहा गुन्हे उघड झाले आहेत

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी राळेगाव यांना आंदोलन करून निवेदन देण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:** -भारत हा आर्थिक महासत्ता बनत असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकारने केला असतांनाच वेगवगळ्या जाती धर्मातील तरुण मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून आंदोलन करतांना दिसत आहे. भारतीय समाज हा जातवर्गीय असल्याने बहुसंख्य तरुण मागास राहण्याचे कारण आर्थिक तसेच सामाजिक देखील आहे. जातीय विषमतेने बहुसंख्य समुहाच्या आर्थिक विकासाच्या संधी हिरावून घेतल्या असल्याचे स्पष्ट दिसत आहे.जनसुरक्षा विधेयक लोकशाही तत्वांना बाधा आणणारे आणि सत्ताधारी प्रशासनाला जास्त अधिकार प्रदान करून नागरिकांच्या हक्काची सरकारला लोकशाही मार्गाने जाब विचारण्याचा याची गळचेपी करण्याचा धोका निर्माण करणारे आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी



धोरणामुळे शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नाही त्यामुळे शेतकरी दर दिवशी आत्महत्या करीत आहे. मागील २५ वर्षात ४ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. शेतकरी कर्जबाजारी होऊन शेती सोडण्याच्या मार्गावर आहे. शेतीसाठी लागणारे बि-बियाणे, खत औषधी, इतर शेती साहित्य यावर १८% ते २४% पर्यंत जिएसटी लावण्यात आला त्यामुळे इतर शेती साहित्याचे भाव वाढले व शेती मालाचे भाव जाणून बुजून सरकारने पाडले यामुळे शेतकरी तोट्याची शेती करुन आत्महत्याकडे वळत आहे.सरकारने ज्याप्रमाणे भांडवलदार, व्यापारी, राजकर्ते यांच्यासाठी जे नफ्याचे धोरण आखतात त्याच पद्धतीने शेतकऱ्यांसाठी धोरण आखले असते तर शेतकरी नफ्यात शेती करु शकला असता पण सरकार शेतकऱ्यांना तोट्याचे धोरण व इतरांना नफ्याचे धोरण असा भेदभाव करते त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात. म्हणुन शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार यासाठी योग्य धोरण आखावे. करीता प्रमुख मागण्या महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक २०२४ घटना विरोधी असल्यामुळे मागे घेण्यात यावे,शेतकऱ्यांना शेती पिकाला किमान हमी भावाचा कायदा करावा म्हणेच स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करावी,सरकारी नौकरी भरती ताबडतोब करावी,शेतकरी शेतमजुरांना १०,०००/- रु. पेन्शनचा कायदा करावा,आयात निर्यात धोरणात हस्तक्षेप करून शेतीमालाचे भाव पाडणे बंद करावे,कापसाला किमान १०,००० रु. व सोयाबिनला किमान ७००० रु. भाव जाहिर करावा,शेतीपर्यंत पांदण रस्ते करण्यात यावे व शेतीपंपाला २४ तास विज मोफत देण्यात यावी,अतिक्रमण धारक शेतकऱ्यांना कायम स्वरुपी पट्टे देण्यात यावे व जमीनीवरून हुसकावून लावणे बंद करावे, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, शेतकऱ्यांसाठी कृषी बजेट सुरु करण्यात यावे,उद्योगात जमीन गेलेल्या विस्तापीत भूमीहीन व शेतकरी युवकांना रोजगार देण्यात यावा,नवीन कामगार कायदा रद्द करण्यात यावा,अंगणवाडी व आशा यांना किमान वेतन लागु करावा,स्मार्ट मिटर लावणे बंद करावे यावेळी कॉ. प्रविण आडे भाकप राळेगांव तालुका सचिव,कॉ. दिनेश पारखी किसान सभा तालुका अध्यक्ष, कॉ.मधुकर केराम भाकप,तालुका सहसचिव, कॉ. मनोहर मांडवकर किसान सभा तालुका सहसहसचिव, कॉ. दिगांबर गोखरे भाकप शाखा सचिव,अजय मेश्राम,सुरेश पेंदोर,विकास गाढवे, वैभव नैताम,सुमित नैताम,अजय गाढवे,ईश्वर पेंदोर,शत्रुघ्नं सोयाम, रूपेश पेंदोर,बाबाराव वडस्कर, गणपत वडस्कर,रविंद्र वडस्कर, प्रकाश बावणे,किशोर नैताम,अमोल जवादे,पुरुषोत्तम देठे,मारोती पंधरे संजय आत्राम,शंकर नेहारे,मनोज पिंपळशेंडे,अमोल ठाकरे, राजु आत्राम,प्रतिक जगताप,राजु कन्नाके, नानाजी नैताम,नामदेव राऊत,नथ्थु मडावी,किशोर पिंपळशेंडे,अनिल मेश्राम,गणेश नैताम,वृषभ पिंपळशेंडे, मोहन मोहितकर,बाबाराव चांदेकर, अविनाश पेंदोर,बंडुजी खंगार, पुंडलीक नैताम आंदोलनकर्त हजर होते

# खंडोबा टेकडीवरील वृक्षतोड प्रकरण विधिमंडळात गाजले; दोषींवर फौजदारी कारवाई होणार वनमंत्री गणेश नाईक यांची माहिती




**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात घाटकोपर पश्चिमचे आमदार श्री. राम कदम यांनी त्यांच्या मतदारसंघातील खंडोबा टेकडीवरील मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोड प्रकरणावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले.आमदार राम कदम यांनी सभागृहात सांगितले की, काही स्वार्थी लोकांनी ३०० हून अधिक झाडांची कत्तल खंडोबा टेकडीवर केली असून, या प्रकारामुळे पर्यावरणाचा मोठा तोटा झाला आहे. या वृक्षतोडीस जबाबदार असणाऱ्यांवर तातडीने फौजदारी कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. या मुद्द्यावर सविस्तर उत्तर देताना राज्याचे वनमंत्री श्री. गणेश नाईक यांनी आश्वासन दिले की, "खंडोबा टेकडीवरील वृक्षतोडीप्रकरणी फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई केली जाईल. ही टेकडी वन विभागाच्या अखत्यारित येते. त्यामुळे कोणीही टेकडीवर तोडफोड करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला कायद्याप्रमाणे सखोल चौकशी करून कठोर शिक्षा केली जाईल."यासोबतच, आमदार राम कदम यांनी खंडोबा टेकडीवर सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून नव्याने झाडे लावण्याची मागणी केली. त्यावर वनमंत्र्यांनी सांगितले की, "राम कदम यांनी दिलेल्या पत्राच्या आधारे सामाजिक वनीकरण विभागास सूचित करण्यात आले असून, खंडोबा टेकडीवर वृक्षारोपणाचे काम हाती घेतले जाईल."या घटनेने पर्यावरण रक्षणाबाबत जागरूकता वाढवण्याची गरज अधोरेखित झाली असून, स्थानिक नागरिकांनीही खंडोबा टेकडीच्या संरक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जासई विद्यालयात मोठ्या उत्साहात गुरुपौर्णिमा साजरी.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री . छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज , जासई विद्यालयात गुरुवार दिनांक १० जुलै २०२५ रोजी सालाबादप्रमाणे या वर्षीही गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . मानवी जीवनातील गुरुचे स्थान लक्षात घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन आठवी अ व ब या वर्गाकडून करण्यात आले .कार्यक्रमाची सुरुवात महर्षी व्यासांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली . या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे व्हा. चेअरमन डी . आर . ठाकूर साहेब , विद्यालयाच्या प्राचार्या सौ. म्हात्रे . के. जी . मॅडम , पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम तसेच विद्यालयातील सर्व सेवक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. आठवी अ च्या वर्गशिक्षिका सौ वर्तक मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत गुरूंचे महत्व सांगितले. विद्यालयातील प्रांगणात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ग्रीटिंग कार्डचे प्रदर्शन भरवण्यात आले तसेच विद्यालयातील सर्व गुरुंना गुलाब पुष्प , पेन व ग्रीटिंग कार्ड देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व अध्यक्ष यांच्या हस्ते विद्यालयातील इयत्ता आठवी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी कु. राणगे सृष्टी व कोकरे श्रेयश या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कु. घरत सान्वी , कु. मानसी हिपरकर , कु. वेदिका जगताप यांनी आपल्या धडाकेबाज भाषणातून गुरुपौर्णिमेचे महत्व सांगितले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी. मॅडम यांनी आपल्या उठावदार शैलीतून गुरूंची तसेच गुरुपौर्णिमेची माहिती सांगितली. विद्यालयाचे व्हा. चेअरमन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्वांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या . शेवटी ज्येष्ठ शिक्षिका सौ. ठाकूर एस. ए. मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुरुपूजन

## गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर येथील प्रियदर्शनी इंग्लिश मीडियम स्कूल इंदापूर मध्ये संस्थेचे चेअरमन नायर सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य श्री.सुधीर भिसे सर यांच्या मार्गदर्शनानुसार गुरुपौर्णिमानिमित्त महर्षी व्यास यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून गुरु पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी व्हा.चेअरमन आदरणीय इम्रान शेख सर,प्राचार्य श्री सुधीर भिसे सर,उपप्राचार्य श्री.बोधले सर,सर्व शिक्षक,उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचे व आई-वडिलांचे औक्षण व पूजन केले. शाळेतील काही विद्यार्थ्यांनी शिक्षकाबद्दल आपले मनोगत व्यक्त करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केले.तसेच शाळेतील सहशिक्षिका कु. नलवडे मॅडम यांनी गुरुपौर्णिमा तसेच गुरु शिष्य यांच्यातील नात्याचे महत्त्व विध्यार्थी यांना पटवून सांगितले.यावेळी संस्थेचे व्हा.चेअरमन आदरणीय इम्रान शेख सर यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन सर्व शिक्षक मार्गदर्शकांनाचे गुरुपौर्णिमेच्या निमित्त कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दहावीच्या विद्यार्थ्यांनी कु.तन्वी जाधव,सिद्धी



सरगर यांनी केले तर आभार प्रदर्शन सोनल भोईटे हिने केले.

# गोंदिया -स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था गोंदिया चे दुसरे वर्धापन दिवस सतनाम नशा मुक्ती केंद्र गोविंदपुर रोड

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**
**गोंदिया प्रतिनिधी**

गोंदिया येथे 9 जुलै ला साजरा करण्यात आला. सर्वप्रथम संत कबीर साहेब व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. लोकेश कुमार चिर्वतकर होते.

प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा.सचिन भाऊ बनसोड संस्था सचिव टी. वाय. चिर्वतकर तसेच कार्यकारिणी सदस्य सौ. सुनीता सव्वालाखे,रुतिका इलमकर व श्री सोनेवाने जी उपस्थित होते.

उपस्थित कार्यक्रम अध्यक्ष डॉ. लोकेश कुमार चिर्वतकर यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले तसेच भविष्यात संस्था गरीब लाभार्थींना विशेष सवलत देईल असे जाहीर केले उपाध्यक्ष सचिन भाऊ बनसोडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन सौ. सुनिता सव्वालाखे मॅडम यांनी तर आभार सौ.सारिका ब्राह्मणकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला ए. ए. ग्रुप, आत्मपरिचय समूह, नई सुबह, अल अनॉन समुह, मॉर्निंग समूहाचे सदस्य उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीकरिता कु. कीर्ती शिवणकर, मधूभाऊ राऊत , संजय मेंढे यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केले.

# पाटोदा ते शंभर चिरा ५.३ कि.मी. रस्त्याचे बोगस व निष्कृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदार व संबधित अधिकारी यांच्या विरोधात कारवाई करा.

## अन्यथा हायकोर्टात जाऊ :- अड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

पाटोदा ते जवळाला फाटा ५.३ कि.मी. रस्त्याचे राष्ट्रीय महामार्ग ५६१ प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत झालेला बोगस व निष्कृष्ट दर्जाचा रस्ता बांधून इस्टिमेट प्रमाणे काम न केल्यामुळे उखडलेल्या रस्त्याच्या कामात चौकशी करून निष्कृष्ट काम करणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यावर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करुन इस्टिमेट प्रमाणे रोडचे काम करून घेण्याबाबत उच्च न्यायालय बार असोसिएनचे मा.अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव व सामाजिक कार्यकर्ते शेख मोबीन हमीद यांनी केंद्र व राज्य सरकार ला निवेदनाव्दारे मागणी केली आहे. सदरील रस्त्याला ६ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असुन महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत व केंद्र सरकार ग्राम विकास खात्यामधून जे काही अनुदान मिळेल त्या अनुदानातून खर्च करण्याचे नमूद केले असुन योजने खाली अमलात आणणारे प्रकल्प PMGSY च्या मार्गदर्शनाप्रमाणे अमलात आणणे बंधनकारक आहे. पाटोदा तालुक्यामध्ये MRL ०१ राष्ट्रीय महामार्ग ५६१ जवळाला फाटा ते पाटोदा रस्ता बांधकाम (रक्कम ६६१.११ लक्ष) तसेच पाच वर्षे नियमित दुरुस्ती अंदाजे रक्कम ६२.४१ लक्ष व कामाचे मजूर लावणे ५.३ मिलिमीटर तांत्रिक मंजुरी आदेश अधीक्षक अभियंता महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, छत्रपती संभाजी नगर यांनी दिली. सदरील तांत्रिक मंजुरी या आदेशामध्ये अट क्र. १ मध्ये रस्ता सुरक्षते बाबत IRC च्या सर्व मानकामचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची आहे. परंतु सदरील काम मूळ ठेकेदार यांनी सबलेट केलेले असावे व सदरील काम हे राजकीय पाठिंबा असणाऱ्या ठेकेदाराला करण्यासाठी दिल्यामुळे संबंधित ठेकेदार यांनी अंदाजपत्रिका प्रमाणे काम न करता रस्ता न खोदता खालच्या खडीवर मुरुम टाकून कसलाही भर न टाकता काम सुरू केले व जुना रस्ता न खोदता आजूबाजूची खडी ओढून निष्कृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे रस्ता मे व जून २०२५ मध्ये अवकाळी पावसाने उखडला आहे. तालुक्यातील अनेक लोकांनी सदरील रस्त्याच्या तक्रारी केल्या,



सदरील कामाची विभागीय गुण नियंत्रण पथकामार्फत तपासणी करण्याचे तक्रार अर्ज केले आणि अनेकवेळा वृत्तपत्रात पण प्रसिद्ध झाल्या तरी देखील संबधित अधिकाऱ्यांनी कुठलीच कारवाई केली नाही. सदरील रस्ता पाटोदा शहरातील जनता तसेच थेरला, जवळाला, बेलेवाडी व इतर अनेक गावातील लोकांना वापरण्यासाठी जवळचा आहे. या शिवाय बीड वरून पाटोदा मार्गे आष्टी, जामखेड, दौंड, पुणे, आहिल्यानगर, बारामती, चिपळून, कल्याण, बोरवली, कोल्हापुर, मुंबई सारख्या ठिकाणी जाणाऱ्या महामंडळाच्या बसेस ह्याच रस्त्यावरून जातात. तालुक्यातील अधिक नागरिकांनी सदरील दर्जाहीन कामाबाबत ना पसंती व्यक्त केलेली आहे. परंतु अधिकारी लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक व विश्वस्त म्हणून काम करणे अपेक्षित असताना तसं न करता जनतेचा ६.५० कोटी रुपयचा दर्जाहीन काम करून लोकप्रतिनिधी अधिकारी व ठेकेदार यांनी अपहार केला आहे. तसेच इस्टिमेट मधील मानकाप्रमाणे काम न करता दर्जाहीन काम केल्यामुळे सदरील रोड पहिल्याच अवकाळी पावसामध्ये संपूर्ण उखडला असून वरील अधिकारी व ठेकेदार यांनी सदरील दर्जाहीन काम जनतेचा व शासनाचा फौजदारी पात्र विश्वासघात केलेला आहे. त्या मुळे सदरील संपूर्ण कामाची इम्पार्शियल विभागीय गुण नियंत्रकांकडून नागरीका समक्ष गुण पडताळणी करावी व दर्जाहीन काम करणारा ठेकेदार व जबाबदार अधिकारी यांच्या कडून झालेली नुकसान भरपाई घ्यावी व त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे. तसेच प्रशासकीय कार्यवाही करावी व रस्त्याचे काम अंदाजपत्राकाप्रमाणे करून जनतेला दर्जेदार रोड करून द्यावा ही सगळी कारवाई दोन आठवड्याच्या आत करण्यात यावी नसता ना नाइलाजास्तव लोकशाही मार्गाने, घटनेच्या चौकटीत उपोषण, आंदोलन करावे लागेल व वेळे प्रसंगी जनहितार्थ याचिका दाखल करावे लागेल असे निवेदनात म्हटले आहे.

# सोयाबीन पिवळे पडण्याचे नवे संकट

## कृषि विभागाचा सल्ला, शेतकरी पुन्हा आडचणीत!!

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ :**

तालुक्यातील येरोळ व परिसरात सोयाबीनची पाने पिवळे पडण्याचे प्रमाण वाढले असुन शेतकर्‍यासमोर नवीनच संकट उभे टाकले आहे. यावर्षी बहूतांश शेतकर्‍यांना सोयाबीन न उगवल्याने दुबार पेरणी करावी लागली. ज्या भागात सोयाबीन पिक उगवले आहे. तिथे सध्या पाने पिवळी पडल्याचे दिसुन येत आहेत. विशेषता खार्‍या जमीनीमध्ये सोयाबीनचे पाने अधिक पिवळी पडली असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे आता शेतकर्‍यासमोर नवीन संकट उभे टाकले आहे. जमीनीतील लोह या अन्नद्रव्याच्या




कमतरतेमुळे हि समस्या होत असल्याचे तज्ञाचे मत आहे. सोयाबीनची पाने पिवळी पडणे हे क्लोरोसीस ही एक शारीरिक विक्रती आहे. लोह या सुक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता सर्व प्रथम कोवळ्या पानावर दिसुन येते. हरितद्रव्याच्या अभावामुळे पानाच्या शिरामधील भाग पिवळा पडतो. आणि शिरा फक्त हिरव्या दिसतात. सोयाबीनचे प्रथम ट्रायफोलीयट पाने हिरवी राहतात. कारण हे अन्नद्रव्य अचल आहे. लोह रोपट्यात स्थिर होऊन साठविले जाते. म्हणुन नवीन पानामध्ये हि लक्षणे दिसुन येतात. पाने पिवळी पडल्याने हरितद्राव्य कमी होऊन प्रकाश संस्लेशन क्रिया मंदावते आणि पिकाची वाढही खुंटते.परिणामी पिकाचे उत्पादन घटते.

**का पडतात पाने पिवळी...**

लोहाची कमतरता विशेषता खारी जमीन, पाण्याचा निचरा होणार्‍या व चुनखडीयुक्त जमीनीत होते. वनस्पतीमध्ये हिरवा रंग तयार करण्यासाठी लोह आवश्यक असते. अनेक जमीनीचा सामु ( पीएच ) ७:५ पेक्षा जास्त असतो. त्या जमीनीत लोह हा फेरस या उपलब्ध स्थितित न राहता फेरिक या स्वरुपात जातो. आणि तो पिकांना शोधुन घेता येत नाही. त्यामुळे जमिनीमध्ये लोहाची कमतरता असुन पाने पिवळी पडत असल्याचे कृषी साहाय्यक श्रीमती एम.ओ.मोदी यांनी शेतकर्‍यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

**हे उपाय करा.**

सोयाबीन पिकावर किटक नाशकाची फवारणी करताना सोबत ०५ ते १ टक्के फेरस सेल्फटची पानावर फवारणी करावी किंवा ईडिटीए चेलेटेड मिक्स मायक्रोन्युट्रिएन्ट ग्रेड ( २ ) प्रति शंभर लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. अधिक माहितीसाठी कृषी विभागाचा सल्ला घ्यावा असे आवाहान लक्ष्मण खताळ तालुका कृषी अधिकारी शिरुरआनंतपाळ यांनी केले आहे.

# गुरूचा उपदेश पुजनीय असतो; हभप गणेश महाराज स्वामी

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर लातुर**

**शिरुरआनंतपाळ** : गुरूचा उपदेश नेहमीच पुजनीय असतो. गुरु हे समाजाला योग्य मार्ग दाखवतात, त्यांच्या शिकवणीतून समाजाला नैतिक आणि आध्यात्मिक मार्गदर्शन मिळते. त्यांच्या वचनांमध्ये जीवनाचे सार आणि उच्च मूल्यांची शिकवण असते, ज्यामुळे त्यांचा उपदेश नेहमीच आदरणीय आणि पूजनीय असल्याचे मत गुरुवर्य श्री.हभप गणेश महाराज स्वामी यांनी व्यक्त केले.

येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील हावगी स्वामी मठामध्ये गुरुपोर्णिमे निमित्त गुरु पुजन व गुरुचा उपदेश यावर गणेश महाराज स्वामी यांचे किर्तण झाले त्यावेळी ते उपदेश करत होते महाराज पुढे म्हणाले की, गुरु सदा सर्वदा समाजाला योग्य मार्ग दाखवतात. आणि त्यांच्या शिकवणीतून लोकांना नैतिकतेचे, न्यायाचे, आणि सेवेचे महत्त्व कळते. त्यांचे विचार आणि शिकवण लोकांना




योग्य मार्गावर चालण्यास मदत करत असतात म्हणुन प्रत्येकाने सत्संगात सामील होऊन जीवनाचा उध्दार करुन घ्यावा असे आवाहन केले. गुरुपुजना नंतर जमलेल्या भावीक भक्तांना महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# वाशिम येथे स्काऊट गाईडची जिल्हा कार्यकारी समिती सभा उत्साहात संपन्न.

## स्काऊट गाईड मधून आदर्श नागरिक निर्माण होतो- संजय ससाणे,शिक्षणाधिकारी प्राथमिक




भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय वाशिम ची जिल्हा कार्यकारी समिती सभा जिल्हा क्रीडा संकुल वाशिम येथे दिनांक 09 जुलै 2025 रोजी जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक संजय ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती मंगलताई धुपे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, गटशिक्षणाधिकारी मदन मोरे, बद्रीनारायण कोकाटे, शिक्षण विस्तार अधिकारी तथा जिल्हा आयुक्त गाईड श्रीमती संगीता भिंगारे, शिक्षण विस्तार अधिकारी दयानंद लोखंडे, प्राचार्य बाळासाहेब गोटे, विनोद नरवाडे, आर के घुगे, एस बी गि-हे पाटील, व्ही व्ही धोटे, श्रीमती ममता कुंदन गुप्ता, सहचिटणीस श्रीमती ज्योती प्रभाकर भाकरे, केंद्रप्रमुख अशोकराव महाले, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट डॉ. मुरलीधर जाधव, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड सौ इंदिरा राणे, सहाय्यक जिल्हा आयुक्त गाईड श्रीमती एस आर नेरकर, जिल्हा संघटक स्काऊट के एल पवार, जिल्हा संघटक गाईड श्रीमती मनीषा ढोके, ज्येष्ठ स्काऊट मास्टर रमेश घुगे, मंगेश महाजन, जनार्दन बोरकर, वेतन विभागाचे प्रतिनिधी गोपाल वाघमारे ए जी मोडक इत्यादींची उपस्थिती होती.या कार्यकारी समिती सभेची सुरुवात स्काऊट गाईड चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्काऊट गाईड प्रार्थनेने झाली.सुरुवातीला सर्व प्रमुख अतिथींचे स्वागत केल्यानंतर सभेच्या विषयास सुरुवात झाली. त्यामध्ये मागील सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे, वार्षिक कार्यक्रमास मान्यता देणे, ऑडिट रिपोर्टला मान्यता देणे, सन 2025-26 च्या वार्षिक अंदाजपत्रकास व वार्षिक कार्यक्रमाच्या नियोजनास मान्यता देण्यात आली. तसेच मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी आलेल्या तालुका समन्वयक, केंद्रस्तरावर ट्रेनिंग कौन्सिलर नियुक्ती इत्यादी विविध विषयावर चर्चा करून त्यास मान्यता देण्यात आली.यावेळी उपस्थित कार्यकारी समिती सदस्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाधिकारी प्राथमिक तथा जिल्हा मुख्य आयुक्त संजय ससाणे यांनी सांगितले की, स्काऊट गाईड मधून आदर्श भावी नागरिक निर्माण होते त्यामुळे स्काऊट गाईडच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.तसेच यावेळी शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती मंगल धुपे यांनी सांगितले की, स्काऊट गाईड उपक्रम जिल्ह्यातील सर्व शाळेत प्रभावीपणे राबविण्यात असल्याचे सांगितले. या सभेच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन कर्मचारी रुपाली आरु व सदानंद शिरसाठ यांनी परिश्रम घेतले.



## भिवंडी महानगरपालिका शाळांमध्ये नवभारत साक्षरता अभियानांतर्गत दिंडीचे उत्साहात आयोजन

### विद्यार्थ्यांचा वारकऱ्यांच्या वेशभूषेमध्ये साक्षरतेचा संदेश.

**भिवंडी** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये "नवभारत साक्षरता अभियान" अंतर्गत साक्षरता दिंडीचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी रुक्मिणीमातेचे पात्र साकारले तसेच वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी होत साक्षरतेचा संदेश दिला. वारीच्या माध्यमातून "नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा" प्रचार व प्रसार करण्यात आला. विविध घोषवाक्य, फलक, पोवाडे आणि भजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर ( भा प्र. से.), अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर, सहायक आयुक्त अजित महाडिक, तसेच या कार्यक्रमासंदर्भात प्रशासन अधिकारी सौदागर शिखरे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व उपक्रमाचे कौतुक केले. या साक्षरता दिंडीने विद्यार्थ्यांमध्ये साक्षरतेबाबत जागरूकता निर्माण केली असून, समाजातही या अभियानाविषयी सकारात्मक संदेशही पोहोचविण्यात आला आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त वेदांत पब्लिक स्कूलमध्ये भक्तिमय वातावरणात दिंडी मिरवणूक

**कारंजा, (प्रतिनिधी)**
आषाढी एकादशीनिमित्त वेदांत पब्लिक स्कूल, कारंजा येथे भक्ति भावाने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून दिंडी आणि पालखी मिरवणुकीत सहभाग घेतला. चि. शिवम चाकोलकर यांनी विठ्ठलाची तर कु. युक्ती राठोड यांनी रुख्मिणीची प्रभावी वेषभूषा साकारली . चि. समर्थ येवतकर हे वीनाधारी भक्ताच्या वेशात सहभागी झाले. टाळ, मृदंगाच्या गजरात आणि "विठ्ठल-विठ्ठल" नामस्मरणात शाळेपासून सुरू झालेली दिंडी शेजारच्या विठ्ठल मंदिरात पोहोचली. या भक्तिमय वारीत वृक्षदिंडी आणि ग्रंथदिंडी यांचा समावेश होता. चिपळ्यांच्या तालावर चिमुकल्यांनी मार्गक्रमण करत ‘एक झाड एक माणूस’, ‘झाडे लावा, झाडे जगवा’, ‘प्लास्टिक निर्मूलन’ यासारख्या संदेशांचाही प्रसार केला. विठ्ठल मंदिर संस्थेच्यावतीने सर्व वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. विठ्ठल-रुख्मिणी पूजनानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यासाठी च. दहातोंडे मॅडम, सौ. राजश्री गोडकर मॅडम, अन्य शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी फुगडी खेळत विठ्ठलनामात रंग भरला. विठ्ठलाच्या गाण्यांवर ताल धरत पारंपरिक पाऊली सादर करण्यात आली. संपूर्ण परिसर भक्तीरसाने न्हाऊन निघाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना बद्दल विठ्ठल रुख्मीनी मंदीर उत्सव समितीच्या सेवेकऱ्यांनी मुख्याध्यापिका सौ. राजश्री गोडकर मॅडम आणि संपूर्ण शिक्षकवृंदाचे अभिनंदन करत त्यांचा खणानारळ देऊन सन्मान केला.

## मंगरूळपीर शहरातील बसस्थानक परिसरातील रस्ते चिखलमय...

**तालुका प्रतिनिधी.....मंगरूळपीर....**
**मंगरूळपीर** : शहरातील बस स्थानक आवारातील खड्डे त्रासदायक ठरत असून, या खड्यांमध्ये पाणी साचल्याने डासांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेषतः, खड्डयांत साचलेल्या पाण्यामुळे गाळ व घाण निर्माण होत असून, त्यामुळे प्रवाशाच्या दैनंदिन जीवनमानावरही गंभीर परिणाम होत आहे. शहरातील बस स्थानक प्रवेशद्वारासमोरील मुख्य रस्ता असून रस्त्यावर पावसाचे पाणी थांबले आहे. तसेच, बसस्थानक-जुनी वस्तीकडे जाणारा रस्ता आणि या बस स्थानकलगतचे मार्ग याठिकाणीही पाणी साचून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगरपरिषद कडून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. वेळेत रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती न झाल्यामुळे प्रवाशाची समस्या अधिकच तीव्र झाली आहे. त्यामुळे बाहेरून ये जा करणारे प्रवाशी हैराण झाले असून . त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे रस्त्यावर साचलेले पाणी आणि त्यात वाढलेला घाण व गाळ हा समस्या दिनेंदिन वाढत आहे. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना रोजच्या व्यवहारांमध्ये खूप अडचणी येत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांची आरोग्य समस्याही गंभीर बनत आहे. डासांचा प्रादूर्भाव वाढल्याने मलेरिया आणि डेंग्यूसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. या स्थितीमुळे नागरिक तणावात आहेत. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती कार्य सुरू करून रस्त्यांवरील खड्ड्यांचा निपटारा करावा. अशी मागणी नागरिकात जोर धरत आहे



## प्रेरणा फाउंडेशन या सामाजिक संस्थेची आषाढी एकादशी बंजारा वाडी बदलापूर येथील लहान मुलांना दप्तर व खाऊ वाटप करून साजरी.



**बदलापूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)** प्रेरणा फाउंडेशन रजि.546/ AF38784/बदलापूर/ठाणे/महाराष्ट्र या सामाजिक संस्थेची आषाढी एकादशी बंजारा वाडी येथे रविवार रोजी दि.6-07-2025 दु.4 वाजता लहान मुलांना दप्तर व खाऊ वाटप करून साजरी. या कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणा फाउंडेशन संस्थापिका/अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले. एकादशी ला विठ्ठलाच्या दर्शनाला बरेच जण जातात पण यंदा ची आषाढी एकादशी हि या छोट्या बालगोपालांसोबत प्रेरणा फाउंडेशन ने साजरी केली कारण मुले हि देवघराची फुले म्हणतात. या मुलांच्या चेहऱ्यावरील समाधान व हास्य पाहून विठुरायाचे दर्शन घेतल्याचे समाधान झाले. या बंजारा वाडीतील मुले शाळेत पिशवीमध्ये जसे जमेल तसे शाळेतील वही , पुस्तक, कंपास ई.सामान घेऊन जातात.पावसाळ्यात यांची पिशवी भिजल्यास पिशवीतील सामान खराब होते. यासाठी प्रेरणा फाउंडेशन तर्फे येथील बंजारा वाडीतील मुलांना शाळेचे दप्तर व खाऊ वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या वाडीला अन्नदान, धान्यदान, कपडे वाटप यासारखे कार्य प्रेरणा फाउंडेशन करत असते.या कार्यक्रमासाठी प्रेरणा फाउंडेशनचे खजिनदार रोहन गावकर, सचिव वैभव कुलकर्णी, उपखजिनदार सौ.दिव्या गांवकर , प्रार्थना फाउंडेशन चे संस्थापक प्रसाद मोहिते यांचे मोलाचे सहकार्य लाभले व तसेच बंजारावाडीतील मावशीचे यांचे सहकार्य लाभले.प्रेरणा मॅडम ने बंजारावाडीतील लोकांच्या मुलाखती घेऊन तेथील समस्या जाऊन घेतल्या व त्यांना जमेल ते सहकार्य प्रेरणा फाउंडेशन अंतर्गत करण्याचे आस्वाशन दिले.

## प्रेरणा फाउंडेशन या सामाजिक संस्थेची आषाढी एकादशी बंजारा वाडी बदलापूर येथील लहान मुलांना दप्तर व खाऊ वाटप करून साजरी.

**बदलापूर** प्रेरणा फाउंडेशन रजि.546/AF38784/बदलापूर/ठाणे/ महाराष्ट्र या सामाजिक संस्थेची आषाढी एकादशी बंजारा वाडी येथे रविवार रोजी दि.6-07-2025 दु.4 वाजता लहान मुलांना दप्तर व खाऊ वाटप करून साजरी. या कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणा फाउंडेशन संस्थापिका/अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले. एकादशी ला विठ्ठलाच्या दर्शनाला बरेच जण जातात पण यंदा ची आषाढी एकादशी हि या छोट्या बालगोपालांसोबत प्रेरणा फाउंडेशन ने साजरी केली कारण मुले हि देवघराची फुले म्हणतात. या मुलांच्या चेहऱ्यावरील समाधान व हास्य पाहून विठुरायाचे दर्शन घेतल्याचे समाधान झाले. या बंजारा वाडीतील मुले शाळेत पिशवीमध्ये जसे जमेल तसे शाळेतील वही , पुस्तक, कंपास ई.सामान घेऊन जातात.पावसाळ्यात यांची पिशवी भिजल्यास पिशवीतील सामान खराब होते. यासाठी प्रेरणा फाउंडेशन तर्फे येथील बंजारा वाडीतील मुलांना शाळेचे दप्तर व खाऊ वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या वाडीला अन्नदान, धान्यदान, कपडे वाटप यासारखे कार्य प्रेरणा फाउंडेशन करत असते.या कार्यक्रमासाठी प्रेरणा फाउंडेशनचे खजिनदार रोहन गावकर, सचिव वैभव कुलकर्णी, उपखजिनदार सौ.दिव्या गांवकर , प्रार्थना फाउंडेशन चे संस्थापक प्रसाद मोहिते यांचे मोलाचे सहकार्य लाभले व तसेच बंजारावाडीतील मावशीचे यांचे सहकार्य लाभले.प्रेरणा मॅडम ने बंजारावाडीतील लोकांच्या मुलाखती घेऊन तेथील समस्या जाऊन घेतल्या व त्यांना जमेल ते सहकार्य प्रेरणा फाउंडेशन अंतर्गत करण्याचे आस्वाशन दिले.



## गुरू म्हणजे ज्ञानाचा उगम अखंड वाहणारा एक झरा

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**
गुरू म्हणजे निष्ठा आणि कर्तव्य गुरु म्हणजे निस्सीम श्रद्धा आणि भक्ती गुरू म्हणजे विश्वास आणि वात्सल्य गुरू म्हणजे आदर्श आणि प्रतीक आजपर्यंत कळतं न कळतपणे मला ज्ञान दे ना रे या महानायक माझे गुरु धर्मा वसतात त्यांनी मला रोजी रोटीला लावले आणि माणूस म्हणून मला घडवले माणसा सारखे बोलायला लावले आणि वागायला लावले आज गुरुपौर्णिमेनिमित्त आज त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले आणि त्यांनी हि मला पुढच्या वाटचालीसाठी लाख लाख शुभेच्छा दिल्या की आज तु महारष्ट्र चा लाडका गायक आहेस लक्षीमण माळी तु आसाच गात राव्हे हिचं मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो हेच तुला माझा पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा

## वाई बाजार येथे किसान सभेच्या वतीने भर पावसात रास्ता रोको,

**तालुका प्रतिनिधी**
अखिल भारतीय किसान सभा तालुका माहूर कमिटीच्या वतीने शेतकरी कामगार श्रमिक जनतेच्या ज्वलंत प्रश्नांना घेऊन तथा मोदी भाजपा प्रणित केंद्र व राज्य सरकारच्या जनविरोधी धर्मांत जातीवादी धोरणांच्या विरोधात होणाऱ्या ग्रामीण भारत बंदच्या अनुषंगाने माहूर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या वाई बाजार येथील जुने बसस्टॅन्ड वर भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, हा रास्ता रोको दिनांक 9/7/ 2025 रोजी सकाळी 11वाजता भर पावसात करण्यात आला कष्टकऱ्यांच्या देशव्यापी




आंदोलनाची हाक संयुक्त किसान मोर्चा व कामगार कृती समितीने दिली आहे त्याच पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार श्रमिक जनतेच्या जयंती प्रश्नांना घेऊन किसान सभेने भव्य आंदोलनाची तयारी केली होती भाजपा प्रनित मोदी सरकार व राज्यातील फडणवीस सरकार सातत्याने जमिनी घेण्याचा सपाटाला लावला आहे, असे अखिल भारतीय किसान सभेचे नांदेड जिल्हा सचिव शंकर सिडाम हे बोलत होते यावेळी राज्य व केंद्रासरकारच्या विरोधात घोषणाबाजी करून तीव्र निषेध नोंदविण्यात आला, यावेळी सिंदखेड पोलिस स्टेशन चे सहायक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांना खालील मागण्याचे निवेदन देण्यात आले, शेतीमालाला हमीभाव द्या शेतकरी व देश विरोधी स्मार्ट मीटर प्रकल्प रद्द करा शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमुक्ती करा सर्व लाभार्थ्यांना तातडीने घरकुल वाटप करा व अनुदान रक्कम पाच लक्ष करा चिमटा धरण रद्द करा जनसूरक्षा विधेयक रद्द करा असे 16 मागण्याचे निवेदन देण्यात आले आशा वर्कर च्या कर्मचाऱ्यांना सहा महिन्याचे मिळाले नही ते त्वरीत देण्यात यावे या मागणी साठी परिसरातील आशा वर्कर्स मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या यावेळी कॉम्रेड आशा वर्कर्स शिला ठाकूर, कॉम्रेड शंकर सिडाम, किशोर पवार, राजकुमार पडलवार, डॉ बाबा डाखोरे यांची भाषणे झाली कादरखान, गांगजी मेश्राम, परसराम पारडे, दिगंबर अगिरकर, प्रकाश पडलवार कांचन नीलकंठ वार, अनिता कुडमथे वंदना गोकनवार सह अनेक शेतकरी उपस्थित होते हा चक्काजाम किनवट माहूर राष्ट्रीय महामार्गावर झालेने वाहनाच्या मोठ्या मोठ्या रांगा लागल्या होत्या, आंदोलन स्थळी सिंदखेड पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता,

## मालेगांव तहसील कार्यालयात आपदा मित्रांना साहित्य वाटप.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार पाटील.**
वाशिम जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाची क्षमता वाढविण्यासाठी आपदा मित्र व सखिना प्रशिक्षण मे महिन्यात दिले होते.त्यामध्ये मालेगाव येथील प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. हे प्रशिक्षणार्थी ‘आपदा मित्र’ व ‘आपदा सखी’ म्हणून सद्यस्थिती मध्ये तालुक्यात कार्यरत आहे.आपत्ती कधीही, कुठेही येऊ शकते. अशा प्रसंगी आपण सज्ज असलो तर आपत्तीचे संकट संधीमध्ये रूपांतरित होऊ शकते हे सर्व आपत्ती आपदा मित्र व सखींना प्रशिक्षणा दरम्यान शिकून तरबेज करण्यात आले.मात्र प्रशिक्षणार्थी कितीही तरबेज, हुशार ,चतुर असला तरी आपदाच्या वेळी त्याच्याकडे योग्य ती साधन सामग्री असणेही तेवढेच आवश्यक होते .त्याच अनुषंगाने मालेगाव येथील तहसील कार्यालयामध्ये तहसीलदार दीपक पुंड यांच्या हस्ते व नायब तहसीलदार रंजना गोरे,अरविंद करंगळे यांच्या उपस्थीत तालुक्यातील सर्वच आपला मित्र व सखीना साहित्याचा वाटप करण्यात आला.जेणेकरून आपदाच्या वेळी ते गरजूंना योग्य ती मदत करतील.या नंतर सर्व आपदा मित्र व सखी ह्या तालुक्यातील आपती मध्ये सापडलेल्या नागरीकसाठी निश्चित मदतीला धाऊन जातील व त्यांची रक्षा सक्षमपणे करतील अशी हमी गणेश खुळे यांनी दिली.या प्रशिक्षणामध्ये प्राथमिक उपचार, अग्निशमन तंत्र,सुरक्षित बचाव उपाय, जलद प्रतिसाद प्रणाली , टीमवर्क व समन्वय अशा विविध विषयांवर प्रशिक्षित केले.य कार्यक्रमाला प्रशिक्षणात आशा व अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.ह्या मध्ये प्रामुख्याने प्रमीला राठोड,चैताली सानप,अश्विनी बकाल, सोनू आठवले,वैष्णवी खंडारे, प्रमोद सांगळे,कार्तिक घुगे,सागर मुंढे, संतोष जाधव, आदित्य देवळे,योगेश घुगे,अजिंक्य मेडशीकर सह परिसरातील आपदा मित्रांची उपस्थिती होती.



## अंबेजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी

### 181 कोटींच्या प्रशासकीय मान्यता -वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.संतोष पाटील**
बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने १८१ कोटींच्या प्रशासकीय मान्यता दिल्या आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य नमिता मुंदडा, श्रीजया चव्हाण यांनी विधानससभेत प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, अंबेजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये १५० एमबीबीएस व ८७ पीजी विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेनुसार शैक्षणिक व रुग्णसेवा सुविधा असून क्षमतेच्या तुलनेत रुग्णसंख्या अधिक असल्याने तातडीने सुधारणा आवश्यक आहे. त्यासाठी २८० खाटांची दुरुस्ती, २५० क्षमतेच्या वसतिगृहाचे बांधकाम, मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, डांबरी रस्त्यांचे बांधकाम,जीएनएम नर्सिंग महाविद्यालयाचे बीएससी नर्सिंगमध्ये रुपांतर करणे यासाठी सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन आर्थिक वर्षांसाठी १८१ कोटी रुपयांच्या खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याचबरोबर रिक्त प्राध्यापक पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती प्रक्रिया सुरू आहे. महाविद्यालयात कॅन्सर उपचारासाठी एल-१,एल-२, एल-३ सुविधांची उभारणी करण्यात येणार असून त्यासाठी नवीन धोरण लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार आहे. तसेच, न्यूरोलॉजी, न्यूरोसर्जरी, कार्डिओलॉजी यांसारख्या सुपर स्पेशालिटी सेवा उपलब्ध होण्यासाठी केंद्र शासनाच्या ‘एनपीएनजीसी’ योजनेंतर्गत प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. या सर्व आरोग्य सुविधा या आर्थिक वर्षातच कार्यान्वित करण्यात येतील, असे आश्वासनही वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सभागृहात दिले.

## देगलूर शहरात मटक्यासह अवैध धंद्यांचा वाढला जोर

### सामाजिक कार्यकर्त्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन, कार्यवाहीची मागणी

**देगलूर प्रतिनिधी/**
**देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शहर व परिसरात सध्या अवैध धंद्यांचा जोर वाढला असून, पोलीस यंत्रणा तोंडावर बोट ठेऊन अवैध धंद्यांना पाठबळ देण्याचे काम करत आहे. परिणामी शहर व परिसरात अवैध धंदे बेफाम चालू असून, यावर आळा घालून संबंधित दोषी पोलिसांवर कार्यवाही करण्याची मागणी माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समितीचे प्रसेनजीत दावणगीरकर व पत्रकार संगपाल मदने यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. शहरात सध्या अवैध धंद्यांना उत आला असून, जुने बसस्थानक, नवीन बसस्थानक, शासकीय विश्रामगृहासमोर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नजीक यासह शहरात ठिकठिकाणी मुंबई, कल्याण, मिलन डे या प्रतिबंध असलेल्या जुगार अड्यांचे दुकान थाटले असून उघड्यावर मटक्याचे आकडे खेळले जात आहेत. परिणामी सध्या या जुगाराच्या नादात शेकडो लोकांची घरे उध्वस्त होत असून, मटक्याच्या धंद्यात दररोज तीन ते चार लाखांची उलाढाल होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. याशिवाय शहर अवैध धंद्यांचे माहेरघर होत असून, गुटखा, अवैध दारूविक्री, जुगार, मटका, स्वस्त धान्याचा काळाबाजार, अवैध पेट्रोल, डिझेल विक्री, अवैध वाळू वाहतुक व विक्री यासह एक ना अनेक धंदे सुसाट आहेत. पोलीस निरीक्षक व संबंधित बीट अंमलदार यांच्यासह डीबी पथकातील कर्मचारी करतात तरी काय? याबद्दल संशय व्यक्त केला जात असून, पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल संशय व्यक्त केला जात आहे. यामागे आर्थिक तडजोड असल्याची चर्चादेखील दबक्या आवाजात सुरू असून, या धंद्यात गुरफटून तरुण व युवा पिढी बरबाद होण्याच्या मार्गावर असून, पोलीस यंत्रणा याबद्दल अनभिज्ञ असल्यासारखे वागत आहे. दरम्यान याबद्दल निवेदनकर्त्यांनी पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांना निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी केली होती. परंतु सादर निवेदनास केराची टोपली दाखविण्यात आल्याचा आरोप निवेदनात केला आहे. दरम्यान येत्या आठ दिवसांत सखोल चौकशी करून अवैध धंद्यांचा बिमोड करण्यासह संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रसेनजीत दावणगीरकर व संघपाल मदने यांनी निवेदनाच्या शेवटी दिला आहे.**